# आजचा सुधारक

विवेकवादी चिंतनाला वाहिलेले मराठी मासिक

वर्ष 25 अंक 9 डिसेंबर 2014

**ह्या अंकात**

2 बुद्धिवादी आणि सुशिक्षित समाजाची नीतिमत्ता *त्र्यं. शं. शेजवलकर*
2 मन केले ग्वाही : (लेखांक पहिला) खिळखिळी लोकशाही *नंदा खरे*
7 बुरूज ढासळत आहेत... सावध *इसादास भडके*
11 हे प्रेतांचे कारखाने थांबवा! *सुधीर बेडेकर*
19 जनआंदोलनं – साधीसरळ गुंतागुंत *सुनील तांबे*
23 डावा आदर्शवाद आणि खुली बाजारपेठ *मिलिंद मुरुगकर*
26 ईश्वर - एक मुक्त चिंतन *भालचंद्र काळीकर*
30 कुणाच्या खांद्यावर कोणाचे ओझे *अश्विनी कुलकर्णी*
32 सृष्टिक्रम आणि विवेक *दिवाकर मोहनी*

संस्थापक – संपादक
**दि. य. देशपांडे**
(1918-2006)

कार्यकारी संपादक
**अनुराधा मोहनी**

संपर्कः
अनुराधा मोहनी anumohoni@gmail.com 9881442448
भरत मोहनी bharat_i@yahoo.com 9822736808
aajacha.sudharak@gmail.com

# बुद्धिवादी आणि सुशिक्षित समाजाची नीतिमत्ता

आमच्या बुद्धिजीवी मध्यमवर्गीयांच्या संस्कृतीची स्थिती आज शीड नसलेल्या तारवाप्रमाणें झाली आहे. स्वार्थाच्या आणि अहंकाराच्या भोवऱ्यांत ती सांपडल्यानें बाहेर पडण्याचा मार्ग तिला आज दिसत नाही. पारतंत्र्य जाऊन स्वातंत्र्य आलें, द्विभाषिक जाऊन संयुक्त महाराष्ट्र आलें, बाहेरचें जग अशा तऱ्हेनें कितीतरी बदललें, तरी या बदलत्या जगाचे पावलावर पाऊल टाकून स्वत: बदलणें बुद्धीच्या घमेंडीमुळें या संस्कृतीला अपमानाचें वाटतें. मेथ्यु अर्नोल्ड या आंग्ल टीकाकारानें अशा जातीच्या लोकांना 'Philistines' असें संबोधून खऱ्या सांस्कृतिक गुणांचा अभाव असलेल्या अशा लोकांमुळें समाजांत अराजक माजतें, असें म्हटलें आहे. अशा तऱ्हेचें अराजक सध्या महाराष्ट्रांत माजलें आहे. कोणत्याच गोष्टींत कांहींहि चांगलें न पहाता इतरांच्या चांगल्या कार्यावर टीका करणें, हा प्रकार आपल्या समाजांत आज वाढत्या प्रमाणांत रूढ होत आहे. समाजावर अशी टीका करणारे हे लोक स्वत: मात्र 'उपनगर संस्कृतीचे' दासानुदास बनत आहेत. प्लॉट, बंगला, मोटार, रेडिओ, सोफासेट या गोष्टींमध्यें हा वर्ग वाढत्या प्रमाणांत दंग आहे. भोंवतालच्या जगांत आपल्याच लोकांचे खून पडले, जाळपोळ झाली, लूटमार फैलावली, तरीहि या वर्गाची मन:शांति ढळत नाहीं, सुखलोलुपपणा यत्किंचितहि कमी होत नाहीं.

महाराष्ट्राच्या सामाजिक नीतिमत्तेच्या अवनतीची समस्या व्यासपीठावरील उपदेशानें, अथवा व्याख्यानबाजीनें सुटूं शकेल असें मला प्रामाणिकपणें वाटत नाहीं. कायदे करून अथवा शाळाकॉलेजांतून बौद्धिकें घेऊनहि या प्रश्नाची सोडवणूक होण्यासारखी नाहीं. नीतिमत्ता हा विषय मूलत: परंपरा, आदर्श आणि अंत:प्रेरणा यांच्या कक्षेंत येणारा विषय आहे. हे आदर्श, परंपरा अथवा अंत:प्रेरणा समाजमनांत निर्माण व्हावयाच्या तर आमच्या बुद्धिवादी आणि सुशिक्षित समाजांत त्या प्रथम निर्माण झाल्या पाहिजेत. म्हणजे या लोकांच्या उदाहरणावरून झिरपत झिरपत त्या समाजाच्या खालच्या थरांपर्यंत येऊं शकतील."

*त्र्यं. शं. शेजवलकर*

•••

## आदरांजली

'आजचा सुधारक'चे आजीव सभासद श्री सदाशिव अमरापूरकर यांचे दि. 3 नोव्हेंबर 2014 रोजी दु:खद निधन झाले. त्यांना आसू परिवारातर्फे भावपूर्वक आदरांजली.

ते चित्रपट व नाट्यक्षेत्रातील चतुरस्र अभिनेता होते व त्याचबरोबर त्यांना सामाजिक भानही होते. वैचारिक वाचनाची आवड होती. सामाजिक कृतज्ञता निधी, नर्मदा बचाओ आंदोलन, अण्णा हजारे यांचे भ्रष्टाचार विरोधी आंदोलन, अंधश्रध्दा निर्मूलन समिती इत्यादी सामाजिक संघटनाच्या चळवळीत त्यांचे बहुमूल्य योगदान होते. एक संवेदनशील कलांवत म्हणून त्यांची ख्याती होती.

त्यांच्या परिवाराच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत.

# मन केले ग्वाही : (लेखांक पहिला)
# खिळखिळी लोकशाही

*नंदा खरे*

विवेक सामाजिक समस्या खाजाउ इतिहास शिक्षण

*आजचा सुधारक या मासिकाचे प्रकाशन सुरू झाल्याला लवकरच पंचवीस वर्षे होतील. एप्रिल एकोणीसशे नव्वद ते मार्च दोन हजार पंधरा या काळात जगात मोठाले बदल झाले. काही बदल पातळीचे, quantitative होते, तर काही गुणात्मक, qualitative होते. काही मात्र या दोन्ही वर्गांपेक्षा मूलभूत होते, आलोक–बदल किंवा paradigm shift दर्जाचे.*

*या बदलांबद्दलचे माझे आकलन तपासायचा हा एक प्रयत्न आहे, विस्कळीत, अपूर्ण, असमाधानकारकही. पण असे प्रयत्न करणे आवश्यकही वाटते.*

## शीतयुद्ध आणि त्यानंतर

एकोणीसशे नव्वदच्या आधीची पंचेचाळीस वर्षे सर्व जग शीतयुद्धाच्या छायेत होते. ताबडतोब आधीची पंधरा वर्षे ब्रिटनमध्ये (यूनायटेड किंग्डम) स्थितिवादी हुजूर पक्ष सत्तेत होता. यांपैकी तेरा वर्षे (1975–88) मार्गरेट थॅचर ही 'पोलादी महिला' पंतप्रधानपदी होती. अमेरिकेत (युनायटेड स्टेट्स) आठ वर्षे (1980–88) रेगन या स्थितिवादी रिपब्लिकन राष्ट्राध्यक्षाची सत्ता होती. या दोन नेत्यांची धोरणे 'थॅचरिझम' व 'रिगनॉमिक्स' या नावांनी ओळखली जातात. दोन्ही धोरणांचा गाभा बाजारपेठेला जास्तजास्त मुक्त करण्याचा आणि मोठ्या कार्पोरेशन्सना जास्तजास्त धार्जिणी सरकारी धोरणे राबवण्याचा होता.

यूरोपीय देश, जपान वगैरे श्रीमंत देशांचा या प्रकारच्या मुक्त बाजारपेठी धोरणांकडे फारसा कल नव्हता. परंतु आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये ब्रिटिश–अमेरिकन कॉर्पोरेशन्सना तोंड द्यावे लागत असल्याने हे देशही आपापल्या कॉर्पोरेशन्सना मोकळीक व आधार देऊ लागले. अशा रीतीने 'पहिले जग' म्हणून ओळखला जाणारा जगाचा भाग पूर्णपणे मुक्त बाजारपेठी झाला. या धोरणांमागचे अर्थशास्त्र 'शिकागो स्कूल'च्या विचारप्रणालीवर बेतलेले होते. या पंथाचा सर्वांत प्रसिद्ध पुरस्कर्ता मिल्टन फ्रीडमन होता. या जगाचा 'आर्थिक पोप' झाला, जगद्गुरू झाला.

मुळात साम्यवादी धोरणे वापरणारे सोव्हिएत यूनियन व चीन हे देश नैसर्गिक संसाधनांमध्ये पहिल्या जगाइतक्या सुस्थितीत कधीच नव्हते. ते ना स्वतःतील दोष ओळखून दूर करू शकले, ना आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पहिल्या जगाला टक्कर देऊ शकले. अखेर 1989 साली सोव्हिएत यूनियनचे डझनभर देशांत विघटन झाले. चीनने कम्यूनिस्ट पक्षाचे नावच केवळ टिकवले, व धोरणे मात्र पूर्णपणे भांडवलवादी,बाजारपेठी केली. बरे, या दोन्ही कम्यूनिस्ट म्हणवणाऱ्या देशांनी देशाची संपत्ती मोठ्या प्रमाणात पक्षाच्या सदस्यांमार्फतच खाजगी संपत्तीत परिवर्तित केली. यामुळे मुळात त्या देशांमध्ये कोणत्या नमुन्याचा साम्यवाद होता हे मला तरी कळेनासे झाले. आज तर 'दुसरे' म्हटले जाणारे जग हे पूर्वीच्या पहिल्या जगासारखेच पण कमी कार्यक्षम आहे. यात चीनचा अपवाद करणेही शंकास्पद ठरेल, कारण तेथील कामगार–मालक संघर्ष सातत्याने वाढत असल्याच्या, आकडेवारी सदोष असल्याच्या बातम्या येत असतात.

या दोन्ही देश–संचाबाहेरचे गरीब देश 'तिसरे जग' म्हणून ओळखले जाई. ते ना मुक्त बाजारपेठेचा एकारलेला पुरस्कार करत होते, ना साम्यवादाचा. मुळात हे बहुतेक देश पूर्वी पारतंत्र्यात होते, व नंतरचेही स्वातंत्र्य फार सीमित, बरेचसे नाममात्र, असेच आहे. या देशांना आंतरराष्ट्रीय मंचावर फारसे हक्क नाहीत. त्यांच्या प्रजांना देशांतर्गत हक्कही

फार सीमित रूपात आहेत. या देशांची धोरणे पूर्वी व आजही कधी मुक्त भांडवली तर कधी पूर्ण सरकारी नियंत्रणाची, अशी हेलकावत असतात.

हे भारतापुरते जरा तपशिलात पाहू. ज्याला नेहरूप्रणीत समाजवाद (Nehruvian Socialism) म्हणतात, ते भांडवलवाद व सामाजिक–सरकारी नियंत्रण यांचे मिश्र रूप होते. स्वातंत्र्याच्या वेळी अत्यंत कमी उपलब्धता असलेली संसाधने बऱ्याच प्रमाणात सरकारी नियंत्रणाखाली होती; उदाहरणार्थ : वीज, सीमेंट, लोखंड, पेट्रोल–डीझेल, काही कळीचे महत्त्व असलेल्या वस्तू (essential commodities), इत्यादी. निर्यातीला उत्तेजन आणि आयातीवर कडक निर्बंध, हेही परकी चलनाच्या क्षेत्रात आवश्यक असे सरकारी हस्तक्षेप होते. आज जरी या प्रकाराचा उल्लेख हेटाळणीने 'लायसन्स–परमिट राज' असा केला जात असला तरी स्वातंत्र्यापासून थेट 1975 पर्यंत त्याला पर्याय नव्हता. आज आयात–वस्तूंमध्ये फार मोठा भाग इंधन हा आहे. पंचाहत्तर सालापर्यंत त्यासोबत अन्नही होते.

आज व्यापार–मंत्री निर्मला सीतारामन यांनी मंत्री म्हणून पहिले वक्तव्य केले, की सोन्याच्या आयातीवरचे नियंत्रण सौम्य करायला हवे. याचा अर्थातच इतर आवश्यक वस्तूंच्या आयातीवर, आयात किंमतींवर वाईट परिणाम होणार (आणि हो, मी सोन्याची आयात कोणत्यही दृष्टीने आवश्यक मानत नाही.). असले विधान 1975 पर्यंत कोणताही व्यापार–मंत्री करू धजला नसता. आजही ते धाष्ट्र्याचेच आहे, कारण गेल्या चारेक महिन्यांतच सोन्याच्या आयातीमुळे 'ट्रेड गॅप' दुप्पट झाली आहे !

तर हे नियंत्रणपर्व कधीतरी पंचाहत्तरनंतर अनावश्यक वाटू लागले. देशाची मूलभूत संसाधन यंत्रणा, देशाचे infrastructure 'टेक ऑफ' स्थितीत आले. आता हे 70 सालीच आले होते, की 80 साली, हा तज्ज्ञांमधला वाद आहे. पण आणिबाणीनंतरच्या जनताराजवटीत नियंत्रण सैलावण्याची सुरुवात झाली, व नंतरची पंधरा वर्षे ते सातत्याने सैलावतच होते. कधी कधी ही ढिलाई जास्त होऊन देशाची पत शंकास्पद होई. हे दुरुस्त करायला कधी रुपयाचे अवमूल्यन केले जाई, तर कधी मानहानी पत्करून देशाचे सोने गहाण ठेवण्याची चर्चा होई. नक्त परिणाम असा, की भारत अपरिहार्यपणे आर्थिक उदारीकरणाकडे (भाषांतर : मुक्त बाजारपेठी, कॉर्पोरेशनधार्जिण्या, करसवलती देणाऱ्या भांडवलवादी धोरणांकडे) सरकत गेला.

**'प्रातिनिधिक' लोकशाही?**

भांडवलवादी (त्यातही मुक्त बाजारपेठी) अर्थव्यवस्था आणि लोकशाही ही राजकीय रचना (संस्था, व्यवस्था, काय म्हणाल ते!) नेहेमी एकत्रच जगतात आणि एकीशिवाय दुसरी जगूच शकत नाही असे सांगितले जाते. पण शीतयुद्धाच्या काळात सोव्हिएत प्रभावाखालील पूर्व जर्मनी व इतरही अनेक देश आपापल्या देशात लोकशाहीच आहे, असे सांगत असत. पूर्व जर्मनीचे तर नावच 'जर्मन लोकशाही गणराज्य' (German Democratic Republic) असे होते. म्हणजे प्रत्येक देशातील समाज आपल्याकडील लोकशाहीची आवृत्तीच इष्ट, आणि त्यासाठी आपली अर्थव्यवस्थाच इष्ट असे सांगत असतो. प्रत्येकच समाज अर्थव्यवस्थेवर कमीजास्त निर्बंध लावतो, तसे आणि तितपतच नियंत्रण करणेच योग्य असे सांगतो. आणि हे निर्बंध लोकशाही पद्धतीनेच ठरवले गेले आहेत, असेही सांगतो.

आज जगभर कोणत्या ना कोणत्या प्रकारची प्रातिनिधिक लोकशाही वापरात आहे, कधी सांसदीय ((parliamentary) तर कधी अध्यक्षीय (presidential). आणि अर्थव्यवस्थाही कमीजास्त मुक्त असते. जास्त मुक्त अर्थव्यवस्था जास्त चांगलीही असते, असेही सांगितले जाते.

या नमुन्याच्या प्रातिनिधिक लोकशाहीला पर्याय आहे का? खरे तर मला गेल्या शतकात हा प्रश्न फार त्रास देत नसे. ढोबळमानाने भारतातल्या निवडणुका मुक्त आणि न्याय्य असतात, विशेषतः महाराष्ट्रात, हे मला खात्रीलायक वाटत असे.

आणि पुरेसेही वाटत असे.

आज या दोन्ही बाबींबद्दल माझ्या मनात घोर शंका आहेत.

एकूण मतदारसंख्येच्या तीसेक टक्के मतदारांना पसंत असलेले लोकप्रतिनिधी, अशांपैकी चाळीसेक टक्के एकत्र येऊन होणारी सरकारे, यात कोणत्या अर्थाने लोकशाही असते?

एका गरीब मतदारसंघाचा (परभणी 2014) आमदार होण्यासाठी उमेदवार सत्तर ते शंभर कोटी खर्च करतात अशा बातम्या आहेत. यांपैकी बहुतेक खर्च बेकायदेशीर असतो.

राजकारणाचे गुन्हेगारीकरण, हा मुद्दा कधीही नव्हता तेवढा आज चर्चेत आहे. येऊन जुना झाला आहे, म्हणा.

कट–आऊट्स, फ्लेक्सेस, रेडिओ–टीव्ही जाहिराती, होलोग्रॅम्स, पेड न्यूज, निवडणूक पॅकेजेस, सोशल मीडिया मोहिमा, एसेमेस मोहिमा, यांपैकी फार काही गेल्या शतकात दिसत नसे. कधी कोण्या उमेदवाराने यांपैकी काही केलेच, तर त्याच्या कार्यकर्त्यांपासून सर्वांमध्ये चोरटा भाव दिसून येई.

मनी पॉवर, मसल् पॉवर, मीडिया पॉवर साऱ्यांचे प्रमाण जुजबी असे. निवडणूक आयोगाचे अस्तित्व टी.एन.शेषनने ठसवून दिले तो काळ फार जुना नाही. आज चाळीशीत, पन्नाशीत असलेल्यांनाही आठवावा इतका तो काळ जवळचा आहे.

त्या काळात ‘इलेक्टोरल मेरिट’ उर्फ जमेल त्या मार्गाने निवडून येणे, हा शब्दप्रयोग वापरात नव्हता. तसल्या नमुन्याची गुणवत्ता गाठीशी असलेल्या उमेदवारांना राजकीय पक्ष आपोआप निवडत नसत. आज धनदांडगे, बाहुबली, मीडिया–फ्रेंडली उमेदवार पक्षांना आवडतात. मतदारांनाही त्यात काही गैर वाटते असे दिसत नाही.

आणि या साऱ्यांचा संबंध मुक्त बाजारपेठी धोरणांनी पैशाबद्दलचा आदर वाढवण्याशी नाही, हे मला पटत नाही.

या नव्या ‘मनू’त, नव्या वृत्तीमध्ये लोकशाही कितपत उरली आहे?

एकूण भ्रष्टाचार, निवडणुकांमधला भ्रष्टाचार, हे कमी व्हावे यासाठी काही यंत्रणा उभारल्या जात आहेत का? लोकपाल, जनलोकपाल, ऑम्बड्स्मन, वगैरे पदे जास्त सक्षम करण्याचे प्रयत्न होत आहेत का? की तशी अपेक्षा ठेवणाऱ्यांना हास्यास्पद ठरवणे, हाच सर्व राजकीय पक्षांचा कार्यक्रम आहे; जाहीरनाम्यांमध्ये अघोषित, पण प्रत्यक्षात केंद्रस्थानी? म्हणजे लोकशाहीचा मुखवटा तेवढा कायम ठेवून आजचा समाज लोकशाही गाठायचा प्रयत्नही करत नाही आहे. अगदी प्रातिनिधिक म्हणवली जाणारी लोकशाहीही खरे तर नको आहे.

म. गांधींनी व इतर सामाजिक अराजकवादी विचारवंतांनी प्रातिनिधिक लोकशाहीला पर्याय सुचवलेले आहेत. ते सगळे लोकसहभागाने निर्णय घेण्यावर भर देतात. संख्येने लहान गटांसाठी, सुट्या गावांसाठी, खेड्यांसाठी हा पर्याय वापरता येतो, हे दाखवणारी उदाहरणे बरीच आहेत; अगदी भारतात, महाराष्ट्रातही. राळेगण सिद्धी, हिवरे बाजार, मेंढा लेखा, ही तशी उदाहरणे बरीच तपासली गेली आहेत. प्रश्न येतो मोठ्या संख्येच्या गटांच्या संदर्भात. उदाहरणार्थ, आम आदमी पक्षाने एकेका मतदारसंघात सर्वसहभागाने निर्णय घेण्याची ‘स्वदेस’ ही कल्पना मांडली. आजच्या आमदार–खासदार यांच्या मतदारसंघामध्ये मतदारसंख्या लक्ष–दशलक्षांत जातात. एकूण लोकसंख्या तर याहूनही जास्त असतात. एखादा प्रश्न इतक्या मोठ्या संख्येच्या गटाला समजावून देणे, त्यावर जनमतचाचणी (सार्वमत,

referendum) घेणे, मग कृती ठरवणे, ती प्रत्यक्षात करणे; हे सारे अत्यंत अवघड, अशक्यप्राय आहे. आजतरी हा पर्याय वापरून प्रातिनिधिक लोकशाहीवर उपाय, इलाज शोधणे हे स्वप्नाळूच ठरेल.

पण प्रातिनिधिक लोकशाहीतले दोष घटवणे, हटवणे, यासाठी प्रयत्न तरी करायला हवेतच.

आणि असे प्रयत्न अखेर अर्थव्यवस्थेच्या अतिरेकी मुक्ततेपासून दूर जाऊनच करता येतील.

**'मॅमन'चे राष्ट्र**

भारताने एकोणीसशे नव्वदनंतर स्वीकारलेल्या उदार आर्थिक धोरणामागची पाश्वभूमी आणि त्या धोरणाचे राजकीय परिणाम केवळ मुक्त बाजारपेठेकडे वळल्याने घडले, की इतर कशामुळे, हे वाद आहेत आणि राहतील. पूर्वी युक्तिवादांत 'अमुक हे तमुकनंतर घडले, म्हणजेच अमुक हे तमुकमुळे घडले' (post hoc, ergo propter hoc) असे सूत्र काहीजण वापरत. ते चुकीचेच होते. परंतु बाजारपेठ जास्तजास्त मुक्त होतानाच राजकारण जास्तजास्त मूल्यहीन होत गेले, हा योगायोग नक्कीच नाही.

का घडते, हे? अनेक उद्योग प्रामुख्याने राजाश्रयावर चालतात. त्यांच्यातला नफातोटा उद्योजक आणि सत्ताधारी यांच्यातील सुसंवादावर अवलंबून असतो. आणि सुसंवादातून साटेलोटे घडणे सहज शक्य असते. अशा साट्यालोट्यावर आधारित बाजारपेठेत चालते ती 'क्रोनी' भांडवलशाही (crony capitalism). या प्रकारासाठी राजीव सान्यांनी 'क्रौन्य' हा सुंदर शब्द घडवला आहे. आणि क्रौन्याधारित बाजारपेठेत जे घडते त्याला माधव गाडगीळांनी 'खंड–वसुली' (rent seeking) म्हटले आहे. एखादेवेळी rent म्हणजे 'भाडे', यावरून जास्त तीव्र शब्दही सुचतील!

'द इकॉनॉमिस्ट' नियतकालिकाने 15 मार्च 2014 च्या अंकात 'प्लॅनेट प्लूटोक्रॅट' नावाचा लेख प्रकाशित केला. त्यातले महत्त्वाचे मुद्दे असे –

- आज नवे शोध लावण्यापेक्षा खंड–वसुली हा श्रीमंत होण्याचा जास्त सोपा मार्ग आहे.
- यात समाजाचे एकूण उत्पादन वाढत नाही, तर काही जणांचा उत्पादनातील वाटाच फक्त वाढतो.
- याने (अर्थातच) समाजातली आर्थिक विषमता वाढते. (हा माझा उपनिष्कर्ष आहे, लेखात न ठसवलेला).

तर लेखात एक साटेलोटे निर्देशांक (crony capitalism) सुचवला आहे. एखाद्या देशातील डॉलर अब्जाधीशांची संपत्ती किती, हे मोजायचे. ही संपत्ती त्या देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादाच्या (GDP च्या) किती टक्के आहे, ते पाहायचे. ही टक्केवारी म्हणजे साटेलोटे निर्देशांक.

लेखात साटेलोटे कोणत्या उद्योगांत सहज घडते याची एक यादी येते : खनिजे, वनौपज, ऊर्जा, नागरी जमीन, बांधकाम, बंदरे व विमानतळ, जुगारखाने, फोनसेवेसारखी दळणवळण साधने, सुरक्षाव्यवस्थेतील कंत्राटे. किंवा भारतीय संदर्भात म्हणू : कोल–गेट, जंगल ठेकेदारी, गॅस ऑथॉरिटी व रिलायन्स एनर्जी प्रकरण, भूखंड, लवासा, टूजी, शवपेट्या.

आता साटेलोटे हा दुतर्फा व्यवहार असतो. उद्योजक राजाश्रयाने श्रीमंत होतो, तसा सत्ताधारी वर्गही आपल्या आश्रयाचे मोल वसूल करतो(च)! तर मुक्त भांडवलशाहीतून सहज साटीलोटी घडतात, ज्याने सत्ताधारी व उद्योजक एकमेकांना मदत करत झपाट्याने श्रीमंत होतात. याने एकूणात देशाची श्रीमंती मुळीच वाढत नाही. म्हणजे राजकारणी–उद्योजक इतर समाजघटकांचा वाटा चोरत असतात. राजकारणात, विशेषतः निवडणुकांत, जे प्रचंड लक्ष्मीदर्शन घडते, त्याचे मूळ अखेर बाजारपेठेवरचे नियंत्रण कमी होण्यात सापडते.

पण आपण जगभरातले साटेलोटे निर्देशांक, त्यांत होणारे बदल, इत्यादी पाहिलेच नाहीत.

- 2007 पासून 2014पर्यंत पाच देश साटेलोटे निर्देशांकात पहिल्या पाच क्रमांकावर राहिले आहेत, अनुक्रमे – हाँगकाँग, रशिया, मलेशिया, युक्रेन व सिंगापूर(!).
- भारत 2007 साली सहाव्या क्रमांकावर होता, तर आज नवव्या क्रमांकावर आहे. म्हणजे यूपीए सरकारची वेगवेगळी प्रकरणे लक्षात घेऊनही भारतातले क्रौन्य इतर देशांपेक्षा काहीसे कमी वेगाने वाढते आहे.
- चीन या काळात सातत्याने एकोणिसाव्या क्रमांकावर आहे. जर्मनी, दक्षिण कोरिया सातत्याने साट्यालोट्यांपासून दूर आहेत.

पण या तपशिलाच्या काही मर्यादाही आहेत.एकतर फक्त तेवीसच देशांचा तपशील आहे. दुसरे म्हणजे थेट साटेलोटे निर्देशांकांचे आकडे न नोंदता ते स्तंभालेख ( histogram) रूपात आहेत. भारताचा निर्देशांक 2014 साली सुमारे 10% होता. तुलनेसाठी हाँगकाँग 75%, सिंगापूर 15%, जपान 2% असे आकडे आहेत.

कोणाला वाटेल की द इकॉनॉमिस्टच्या आडून ही छुपी साम्यवादी जागतिकीकरण-विरोधी मांडणी केली जात आहे. पण लेखाच्या पहिल्याच परिच्छेदात “वीस वर्षांच्या जागतिकीकरणातून प्रमाणाबाहेर फायदा कमावलेले जगातील सर्वांत श्रीमंत 1% लोक जणु काही एक वेगळेच मॅमनचे राष्ट्र घडवत आहेत” असा उल्लेख आहे. मॅमन (mammon) हा हावरट श्रीमंतीचा ख्रिस्ती देव, नीतिविरहित कुबेर म्हणा.

आणि अस्मितांचा कात्रजचा घाट.

सोबतच आपापल्या प्रांतीय, जातीय, भाषिक इत्यादी अस्मितांना अवास्तव महत्त्व देत बंधुभाव हे मूल्य प्रयत्नाने त्यागले जात आहे. राजकीय विचारधारा, आर्थिक धोरणे वगैरे पाहता काहीही महत्त्व नसलेले मुद्दे लावून धरणे हा राजकारण्यांपैकी काहींचा एकमेव असा USP (Unique Selling Point) झालेला आहे. अशा अस्मितादर्शी नेतृत्वाकडे बहुधा बाहुबली (भाषांतर, गुंड) बेरोजगारांचा ताफा असतो. यामुळे उद्योजकही काहीसे घाबरून अस्मितावादी नेत्यांना पोसत, चुचकारत, पुचकारत राहतात.

यामुळे अनेकानेक महत्त्वाच्या प्रश्नांकडून लक्ष इतर दिशांकडे वळवता येते. पुतळे, प्रतीके, अमुक दिवस, तमुक दिवस, दुकानांच्या पाट्यांवरच्या लिप्या (वाहनांच्या नंबर–प्लेटा, मैलाचे दगड, इत्यादीही यांत आलेच!). गावांची नावे, अशा बैलांच्या शिंगांना मशाली लावून लोकांना भरकटवता येते. अस्मितेच्या राजकारणात असली स्मरणरमणात्मक प्रतीकबाजी महत्त्वाची ठरते.

आता प्रजा ही राज्यकर्त्यांची शत्रू नसते. मग तिला असे कात्रजच्या घाटात का पाठवावे?

आणि ही फसवणूक कशी करावी?

vidya_nand@hotmail.com

●●●

# बुरूज ढासळत आहेत... सावध

*इसादास भडके*

विकास विस्थापित मानसिकता समाज

आजचं चंद्रपूर तेव्हा चांदा होतं. माझ्या बालपणी चांदा हे नाव रूढ होतं. नव्हे मनात तेच नाव घर करून होतं. चांद्याबद्दल अनेक आख्यायिका ऐकवल्या जात. चांदा फार मोठं आहे असं वाटायचं. बीएनआर या झुकझुक गाडीनं

चांद्याला यायचो. गडिसुर्ला हे मूल तालुक्यातलं माझं गाव. गावच्या पायथ्याशी असलेल्या डोंगरावर चढलं की दूरवर मूल दिसायचं. लहान लहान बंगले दिसायचे. डोंगराच्या पायथ्याशी आसोलामेंढाचा पाट वाहताना मनोवेधक वाटायचा. आंबराईत रांगेने उभी असलेली झाडी हिरवी गच्च वाटे. डोंगरावरून पूर्वेला नजर टाकली तर वाहणारी वैनगंगा नदी दिसायची. मार्कंड्याचं मंदिर दिसायचं. धानाच्या मोसमात संपूर्ण परिसर हिरवागच्च आच्छादन लेल्यासारखा दिसायचा. बालकवीच्या 'औदुंबर ' कवितेची आठवण व्हावी असा हा परिसर. गावालगत दोन डोंगरं. एक लाल मातीचा. दुसरा सारवण करायच्या पांढऱ्या मातीचा. दोन डोंगरांच्यामध्ये कधीही न आटणारा बांध. बांधाच्यामध्ये इंग्रजांनी उभारलेला खांब. या खांबावर इंग्रज अपराध्यांना शिक्षा देत अशी कथा. खांबावर बसणारा पक्षी बालकवीच्या 'पारवा ' कवितेची आठवण करून देई. बांधाच्या पारीवर मोठमोठी झाडे. झाडावर उलटी लटकलेली वटवाघुळं. निसर्गानं नटलेलं माझं गाव. डोंगराच्या पायथ्याशी रेस्ट हाऊस व मिशनऱ्यांनी बांधलेलं चर्च. माझं गाव म्हणजे जातिव्यवस्थेचं बोलकं प्रतीक. हे माझं गाव मी तिसऱ्या वर्गात असताना सोडलं. कायमचं सोडलं. चांद्याला आलो आणि चंद्रपूरचाच झालो. चंद्रपूर–गडचिरोली परिसराला झाडीपट्टी म्हणतात. आदिवासी पट्टा म्हणतात. मागासवर्गीय भाग म्हणतात. गोंडवन असंही म्हणतात.

चांदा गोंडराजानं वसवलं. या भागावर गोंडराजाचं साम्राज्य होतं. त्यांनी या भागावर आपल्या अस्तित्वाचा ठसा उमटवला ऐतिहासिक वास्तू बांधल्या. गडकोट बांधले. आपल्या राज्याचा विस्तार केला. राणी हिराईने आपले पती बिरशहा यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ अंचलेश्वर गेटला समाधी बांधली. राणी हिराईने आपल्या पतीकरिता बांधलेली एकमेव समाधी. यातलं पुष्कळसं इतिहासजमा होण्याच्या मार्गावर आहे. दंडकारण्याच्या खरा इतिहास दुर्लक्षित होत आहे. निसर्गानं ओतप्रोत भरलेला हा परिसर. रानावनात वन्यजीव मनसोक्त जगत, वावरत, बागडत. आयुर्वेदाला उपयुक्त असा साठा असलेलं जंगल होतं. पूर्वी आठ–दहा दिवस झळ राहायची. आता झळ अभावानेच, अशी आई सांगायची. सर्वांना हेवा वाटावा असं नैसर्गिक जनजीवन होतं. हे वैभव औरच होतं. आपली बोली, भाषा, संस्कृती यात एकरूप झालेलं जनजीवन होतं. लोककलांचा प्रचंड साठा जतन केलेला होता. लोकजीवनात श्रद्धा होत्या. अंधश्रद्धाही होत्या. व्यवस्थेत लादलेली बंधनेही होती. या साऱ्यात मानव जगण्याचा अट्टाहास करीत होता. आपआपले रीतिरिवाज जोपासत निसर्गात जगत होता. मानवी जीवन कष्टाचं व संघर्षाचं होतं. आजच्या एवढं गुंतागुंतीचं आणि स्वार्थी नव्हतं.

राजा होता, राजा गेला. म्लेच्छ गेले. इंग्रज गेले. प्रजा आली. स्वातंत्र्य मिळाले. लोकशाही आली. काळाच्या प्रवाहात प्रचंड परिवर्तनं आली. मन्वंतरे घडली. काळ कुणाकरिता थांबला नाही. काळ पुढे पुढे सरकतच गेला. काही काळासोबत थांबले. थांबले ते थांबलेच. काही काळासोबत गेले. ते पुढेच गेले. काहींनी परिस्थितीवर स्वार होऊन प्रगतीच्या वाटा चोखाळल्या. औद्योगिकीकरण आलं. संगणक–नेट आलं. जागतिकीकरण, खासगीकरण व उदारीकरण आलं. जगण्याचे सारे संदर्भ बदलले. रोज नवीन काहीतरी येतं. जुनं अडगळीत जातं. वापरा आणि फेका असं काहीसं विस्कळीत व्यवस्थेनं रूप धारण केलं. या साऱ्यांचा केंद्रबिंदू माणूस आहे. माणसाला स्वतःला सांभाळणं अवघड झालेलं आहे. स्पर्धेचं झालेलं आहे. माणूस स्वतःच्या अस्तित्वासोबत सुख अधिक समीप आणण्याचा सातत्याने प्रयत्न करीत आहे. व्यवस्थेची तऱ्हा संपूर्ण उफराटी झालेली जाणवते. आजच्या जीवनशैलीतून ते निदर्शनास येते.

चंद्रपूर–गडचिरोली जिल्ह्याची आदिवासीबहुल आणि मागास जिल्हा म्हणून नोंद झालेली. या पार्श्वभूमीवर अनेक विकासात्मक योजना राबविल्या जातात. त्याचाच भाग, झपाट्यानं औद्योगिकीकरण झालं. दुर्गापूरला महाऔष्णिक केंद्र आकाराला आलं. सिमेंट कारखाने उभे झाले. पोलाद कारखाना सुरू झाला. जागोजागी दगडी कोळशाच्या खाणी

निघाल्या. रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. चारी दिशातून चंद्रपुरात लोकांचा लोंढा वाढला. चंद्रपूरची लोकसंख्या झपाट्यानं वाढू लागली. मोठ्या प्रकल्पात जमिनी गेल्या. स्थापित विस्थापित झाले. जमिनीच्या मोबदल्यात पैसा मिळाला. नोकऱ्या मिळाल्या. शेतीचे प्लॉट पाडले जाऊ लागले. शेतीवर विपरीत परिणाम झाला. जीवनशैली बदलली. पैसा येऊ लागला. ज्याच्याकडे काहीच नाही ते उदरनिर्वाहासाठी मजुरी करू लागले. स्थानिक बाजूला पडले. बाहेरचे स्थायिक होऊ लागले. जमिनीच्या किमती आकाशाला टेकू लागल्या. यालाच शहरीकरण म्हणतात की काय?

वेगवेगळ्या प्रांतांतले आणि जिल्ह्यातले लोक चंद्रपुरात आले. चंद्रपूरची संस्कृती संमिश्र झाली. चंद्रपूरच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, साहित्यिक, शैक्षणिक, आर्थिक बाबींवर चांगला–वाईट परिणाम झाला. चंद्रपूरचे समग्र पर्यावरण बदलू लागले. ‘जेथं भरला नरा, तो गाव बरा ‘ असं झालं. चंद्रपूर उद्योगधंद्यामुळे प्रदूषित शहर झालं. चंद्रपूरनं प्रदूषणात अव्वल स्थान निर्माण केलं आणि साऱ्यांना चक्रावून टाकलं. चांद्याचं चंद्रपूर झालं. होत्याचं नोहतं झालं. चंद्रपूरला लाखोली वाहणाऱ्यांची संख्या कमी नाही. चंद्रपूरच्या चांगल्या बाबींवर भाष्य करण्याऐजी त्रुटीवर निरर्थक बोलणारे अनेक आहेत. शोषणातून पैसा कमवण्याकरिता चंद्रपूरचा वापर करणारे यात आहेत. चंद्रपूरला शिव्या देणारे चंद्रपूरच्याच वास्तव्याला आहेत. चंद्रपूरला अस्थायी म्हणून आलेले चंद्रपूरलाच पैशाच्या लोभापाई स्थायी होतात. गिधाडानं लचके तोडावे तसे चंद्रपूरचे लचके तोडत स्वःच्या उंच उंच इमारती आकाराला आणतात. धार्मिकतेचा बडेजाव माजवत सामान्यांना आपल्या कळपात प्रलोभने दाखवून सामावून घेतात. मुखवटे धारण करून फसगत करीत आहेत. संगणकामुळे सारं जग एक खेडं झालं, असं म्हणतात. सारं क्षणात कळतं. जगातला कुठलाही माणूस कुठेही जाऊ शकतो. अर्थात त्या त्या भागाचे नियम लक्षात घेऊनच. याचा अर्थ असा नव्हे की, मूळ निवाशांना डावलून त्यांच्यावर अन्याय करणे. वेगवेगळ्या शैक्षणिक व इतर प्रतिष्ठानांमध्ये पैशाच्या बळावर इतराना नोकरीमध्ये घेतले जाते. पैशाअभावी स्थानिक लोकांना डावलले जाते. स्थानिकांना न्याय दिला पाहिजे, असे तासन् तास बोलणारेच स्थानिकांच्या इच्छा–आकांक्षा पायदळी तुडवताना आढळतात. गावातल्या जमिनी फार्म हाऊसच्या नावाने भांडवलदार पादाक्रांत करीत आहेत. परिवर्तन आणि अभिसरण अडवता येत नाही. जागतिकीकरणामुळे पुष्कळसं अडगळीत पडत आहे. बोलीभाषा संपतात की काय, असे प्रश्न चर्चिले जात आहेत. इंग्रजीसारखी व्यावहारिक भाषा जगावर अधिराज्य गाजवीत आहे. मोठं व्हायचं तर इंग्रजीशिवाय पर्याय नाही. सारं ज्ञानभांडार इंग्रजीत असल्यासारखं वाटतं. इंग्रजी बरोबर येत नसल्यामुळे अनेक मुलं पुढे जाऊ शकत नाही. शिकवण्या लावाव्या लागतात. ग्रामीण भागात या सोयी उपलब्ध नाहीत. त्यामुळे अनेक पिढ्याच्या पिढ्या बरबाद होत आहेत. अनेक राजहंस नष्ट होत आहेत. ज्याचं फावलं ते मजेत आहेत. सारा पैशांचा लपंडाव सुरू आहे. ज्यांच्याकडे अमाप पैसा आहे, ते आपल्या मुलांना उच्च शिक्षण देतात. काही संघर्ष करत उच्च शिक्षण घेतात. काही सरकारी योजनांचा लाभ घेत उच्च शिक्षण घेतात. ज्याच्याजवळ काहीच नाही ते भरकटत जातात. ही या भागाची फार मोठी शोकांतिका आहे. काबाडकष्ट करून शिकणार चपराशाची नोकरी लागावी म्हणून आशेवर शिकतात. पण मनात शिणलेले हेतू शेण होतात. परिस्थितीवर मात करून उच्च पदावर जाणाऱ्याचं स्वागतच करायला हवं. औद्योगिकीकरणामुळे चंद्रपूरची प्रगती होऊ लागली. नवीन प्रश्न आणि समस्या रौद्ररूप धारण करू लागल्या. पश्चिम महाराष्ट्रात नाकारलेले उद्योगधंदे विदर्भात आणण्याचा घाट शिजू लागला. यातून विदर्भाकडे बघण्याची दृष्टी लक्षात येते. इथल्या पर्यावरणाला डावलले जाते. खेड्यातून रोजगार शोधत शहरात आले. अपृश्यता नष्ट होण्याच्या मोबदल्यात झोपडपट्ट्या वाट्याला आल्या. नवीन समस्येची भर पडली.

दुर्गापूर आणि त्याच्या आजूबाजूचा परिसर माझ्या परिचयाचा आहे. दुर्गापूरच्या समीप लहान लहान खेडे वसलेले. भोवताल जमिनीच्या जमिनी पसरलेल्या. गावाला जंगल लागलेलं. दुर्गापूर महाऔष्णिक केंद्र आकाराला आलं. या भागाचा संपूर्ण कायापालट झाला. त्याचा विपरीत परिणामही झाला. प्रदूषणात आणि उष्णतेत वाढ झाली. अनेक आरोग्यविषयक समस्यांना निमंत्रणं मिळाली. अनेकांना असाध्य रोगांनी पछाडलं. श्वासोच्छ्वासात व्यत्यय येऊ लागला. गावाला लागलेलं जंगल दूरदूर जाऊ लागलं. आधीचं दुर्गापूर ओळखणं अवघड झालं. परिवर्तन झपाट्यानं झालं. रोजगार वाढले. बेकारीही वाढली. चंद्रपुरात रस्त्यानं गर्दी वाढली. वाहतुकीचे प्रश्न छळू लागले. पावसाळ्यात रस्ते आणि नाल्या आपलं असली रूप दाखवतात. हे चंद्रपूरकर चांगल्या प्रकारे जाणतात. चंद्रपूर नव्या रूपानं साकार होताना रस्ते मात्र तेवढेच आहेत. इथल्या धुळीनं श्वेतवर्णीय कृष्णवर्णीय होतात. चंद्रपूर हे काळ्या हिऱ्याचं शहर. इथल्या भूगर्भात दगडी कोळसा तुडुंब साठलेला. दगडी कोळशाच्या खाणी हा साठा रिक्त करायला जागोजागी उभ्या. आता चंद्रपूर पोखरलं गेलं आहे. मातीनं इथला रंग बदलवलेला आहे. मोठाले ढिगारे आकाराला आले. ढिगाऱ्याचं डोंगरात रूपांतर झालं. झरपट नदी व इरई नदीचं पात्र बुजण्याच्या मार्गावर आहे. लहानसा जरी पाऊस आला तर सारं पाणी साचतं. चंद्रपूर पाण्याखाली येतं. चंद्रपुरात पूर म्हटला की दहशत निर्माण होते. चंद्रपूरचं प्रदूषण आणि उष्णता म्हटलं की, बाहेरचे चंद्रपूरला यायला बिचकतात. चंद्रपूर म्हणजे काळ्या पाण्याची सजाच समजली जाते. मात्र सहलीचं बिल सावंतवाडी ते सिरोंचा असं सादर केलं जातं. भामरागड वगैरे त्यांच्या हिशेबातच नसतं. चंद्रपूरचा काळा हिरा संपण्याच्या मार्गावर आहे. झरपट नदी झटपट बुजण्याच्या मार्गावर आहे. चंद्रपूरला महाऔष्णिक केंद्र आहे पण चंद्रपूर अंधाऱ्या झुडपात लपते.

झाडीपट्टीतलं पूर्वीचं वैभव लोपत असून, जंगल नष्ट होत आहे. जंगल छाटले, तोडले जात आहे. पाण्याची पातळी सतत खाली जात आहे. घनदाट जंगलामळे चंद्रपूर–गडचिरोली परिसरातील पाण्याची पातळी टिकून होती. पर्यावरणात आता अनियमितपणा जाणवतो.आता ताडोबासारख्या अभारण्यावर वक्रदृष्टी टाकली जात आहे. ताडोबातून वाघाला हद्दपार करण्याचा डाव दिसतो. अदाणीसारखे अधेमधे डोकं वर काढतात. ताडोबा वाचवण्याकरिता आंदोलन उभं करावं लागतं. हा गंभीर विषय आहे.

उत्खननात दगडी कोळसा गवसला. विजासन टेकडीचा शोध लागला. भद्रनगरीचं प्राचीन रूप कळलं. गडचांदूर, गडिसुर्ला, मूल, रामदेगी यातील उत्खननात प्राचीन इतिहासाची आणि उज्वल संस्कृतीची ओळख पटली. ताडोबा, महाऔष्णिक केंद्र व दीक्षाभूमी चंद्रपूर यातून निसर्ग, मानवता व आधुनिकता यांचा संदेश मिळू लागला. आनंदवननं साऱ्या जगाचं लक्ष वेधलं. ही चंद्रपूरची आधुनिक बलस्थानं आहेत. महाकाली, मार्कण्डा, अंचलेश्वर मंदिर हा ऐतिहासिक ठेवा आहे. चंद्रपूरला गोंडराजाने बांधलेला किल्ला चंद्रपूरची ओळख असून चार दरवाजे व चार खिडक्या शाबूत आहेत. चंद्रपूर शहराला वेढलेला संपूर्ण किल्ला लक्षवेधक आहे. हा किल्ला, दरवाजे व खिडक्या वाहतुकीला व्यत्यय आणतात, अशी ओरड करण्यात येते. काळाच्या प्रवाहात हे सारं नष्ट होणार की काय, हा प्रश्न निर्माण होतो. चंद्रपूर शहरात प्रवेश करायचा म्हणजे कोणत्या ना कोणत्या दरवाजातून आणि कोणत्या ना कोणत्या खिडकीतून प्रवेश करावा लागतो.काहींनी तर किल्ला फोडून तांगळ–तिंगळ वाहतुकीचा मार्ग सोयीकरिता केलेला आहे.

माझ्या घरासमोरून वळण घेत किल्ला गेला. घरासमोर उद्ध्वस्त बुरूज आहे. थोड्या अंतरावर चोरखिडकी आहे. किल्ल्याला लागून घरं बांधण्यात आली. किल्ल्याचा दगड काढून काहींनी स्वतःच्या घरांची पायाभरणी केलेली आहे. त्यामुळे किल्ल्याची भिंत पावसाळ्यात ओलसरपणामुळे थोडीथोडी कोसळत जाते. घरासमोरील बुरूज कधी ढासळेल

याचा नेम नाही. बुरूज ढासळण्याची कल्पना मनात असंख्य विचाराचं मोहोळ निर्माण करते. किल्ल्याच्या शेजारी वाढलेली झाडझुडपं अनैकितेचं दर्शन घडवतात. व्यसनाधीन अशा झुडपांचा आश्रय घेतात. लैला–मजनू किल्ल्याच्या आडोशाने आपले चाळे साधत असतात. काळाच्या ओघात सारं नष्ट होत नाही. जुन्याच्या आधारावर नवं उभं राहतं. जुन्यातलं कुचकामी निकामी होतं. नवीन रूप धारण करतं. मानवी शाश्वत मूल्यं जिवंत राहतात. व्वस्था आपली रूप बदलवत असते. मुखवटा धारण करीत असते. नवीन माध्यमं सर्वांना आकृष्ट करीत आहेत. नवीन योजना राबविल्या जात आहेत. त्या सामान्य लोकांपर्यंत पोहचविल्या जातात काय? याचे फायदे कोण लाटतात, याची उत्तरं आपल्याकडे आहेत. बालपणात बोलीचे संस्कार आपल्यावर होतात. त्याच छत्राखाली आपण लहानाचे मोठे होतो. तेच संस्कार स्पर्धेच्या युगात पुसले जात आहेत. स्पर्धेची भाषा अवगत करणे काळाची गरजआहे. आपला सांस्कृतिक ठेवा इच्छा नसतानाही विसरतो. याचं भान ठेवणं काळाची गरज आहे.

जंगल आपलं, दगडी कोळसा आपला, ऊर्जानिर्मिती आपली, निसर्ग आपला. आपण निसर्गाचे. सारं आपलं असूनही आपलं काहीच नाही अशी अवस्था. चंद्रपूर साऱ्यांना आश्रय देत आहे. आपल्यात सामावून घेत आहे. लोकपूर, इंद्रपूर, चांदा, चंद्रपूरचा प्रवास सुरू आहे. मात्र इथले बुरूज ढासळण्याच्या मार्गावर आहेत.

(*महाराष्ट्र टाइम्स, विदर्भ विशेष – वार्षिक 2014* मधून साभार)

•••

# हे प्रेतांचे कारखाने थांबवा!

*सुधीर बेडेकर*

शिक्षण युवा जीवनशैली

माणूस भोवतालचे जग बदलू शकतो, घडवू शकतो अन् या व्यवहारातूनच स्वतःलाही घडवत जातो. ही माणसाची व्याख्या मानली तर शिक्षणाने माणूस हा माणूस होतो. प्राण्यांच्या पिल्लांना न शिकविता ती अन्न मिळवू शकतात, मोठी होऊ शकतात. पण माणसासारखे जगणे मुळातच शक्य करायला शिक्षण आवश्यक आहे. समाजात वाढताना अनेक मार्गांनी हे शिक्षण आपण शोषत असतो, पण शाळा कॉलेजातल्या शिक्षणाचा त्यात सर्वांत मोठा व महत्त्वाचा वाटा असतो हे उघड आहे.

खरे शिक्षण नेहमी दुहेरी असते. माणूस बाहेरच्या जगाचा एक भाग आहेच, पण तो या जगाचा पूर्ण गुलाम नाही. त्यामुळे त्याची कोणतीही कृती वा शिक्षणही एक दुतर्फी संबंध असेल तरच खऱ्या अर्थी मानवी असेल. मूल म्हणजे एक मातीचा गोळा आहे व त्याला शिक्षणाने आकार द्यायचा आहे. हे मुळातच चूक आहे. मुलाला आकार देतादेताच त्याने स्वतः आपला आकार शोधण्याची, मिळवण्याची प्रक्रिया शिक्षणात चालू राहील तरच ते खरे, चांगले शिक्षण होईल. विद्यार्थी म्हणजे आरसा किंवा ज्ञानरस शोषणारा स्पंज नव्हे. त्याने स्वतः पुढे येऊन ज्ञानाशी हस्तांदोलन केले पाहिजे.

आणि हा स्वतःचा आकार शोधून मिळवण्याची क्षमता असलेलाच माणूस स्वतंत्र असू शकतो. अमुक केल्याने अमुक होते एवढेच बाहेरून त्याच्या मनात जर शिरले तर तो स्वतंत्र होणार नाही. असे अनेक नियम शिकता शिकता त्याला जर मी अमुक करावे, किंवा करीन, अशी निवड सुजाणपणे करण्याची क्षमता आली तरच तो स्वतंत्र होईल. मग केवळ जगाच्या व समाजाच्या नियमांचे तो आंधळे पालन करणार नाही, गुलाम होणार नाही, तर स्वतंत्रपणे निर्णय घेईल, विशिष्ट प्रकारे जगण्याचा प्रयत्न करील. दुसऱ्या शब्दांत, शिक्षणाचा उद्देश माणसाला एखादी फिल्म बनवण्याचा वा खूप

माहिती असलेला कॉम्प्युटर बनवण्याचा नाही. त्याला या ज्ञानाच्या आधारे संकल्प करण्याची, स्वप्ने पहाण्याची क्षमता आणून देण्याचाही आहे. योग्य शिक्षण असे दुहेरी असेल.

किंवा आणखी एका दृष्टीने पहायला लागले तर शिक्षण माणसाला सर्जनशील बनवते. आणि सर्जनशीलता ही मानवाची स्वातंत्र्याबरोबरच मूलभूत अशी खूण आहे. शिकवताना मूल व जग यांच्यात एक संबंध जोडला जात असतो. हा संबंध एकतर्फी असेल तर मुलाचे मन एखाद्या आरशासारखे जगातल्या गोष्टी टिपून घेईल, त्याचे फोटो काढून संग्रही ठेवील, पण त्या वस्तूंचे काय करायचे हे त्याला कळणार नाही. मग त्या वस्तूच त्याला हवे तसे वाकवतील, त्याच्यावर ताबा मिळवतील. तो स्वतःलाच हरवून बसेल. 'या वस्तूंचा ताबा असलेली एक वस्तू' एवढेच त्याला स्वतःविषयी उमगेल. पण शिक्षण जर खरेच योग्य असेल तर त्यात जो मूल व जगाचा संबंध येतो तो दुतर्फी असेल. जगाविषयी त्याला ज्ञान होईल ते 'टिपून घेण्या'च्या स्वरूपाचे नसेल, जगाची त्याला 'समज येईल' – म्हणजेच जगातल्या वस्तूंबरोबरच, त्या वस्तूंचा व त्याचा जो संबंध आहे तोही तसाच जिवंत रूपात त्याला आकळेल. पर्यायाने या संबंधातून त्याला स्वतःविषयीही जाण येईल आणि ही जाण व जगाविषयीचे ज्ञान यांचा उपयोग करून तो पुन्हा जगाशी नीटपणे, सुशिक्षित संबंध जोडू शकेल. सर्जनाची क्षमता त्याच्यात येईल. पोपटपंची आणि समंजसपणा यात नेमका हा फरक असतो. पहिल्यात माणूस गुलाम असतो, दुसऱ्यात आवश्यकतेचे ज्ञान स्वतंत्रपणे पुन्हा वापरू शकतो. पहिल्यात कृती – कृती उदासीन (पॅसिव्ह) रहातो, दगड रहातो; दुसऱ्यात सर्जनक्षम होतो, माणूस होतो.

एक उदाहरण घ्या. एखाद्या लहान मुलाला एक विषय दिला व चित्र चांगले येईपर्यंत त्याला गिरवायला लावले, तर तो ते चित्र हुबेहूब काढू शकेलही. पण रंगाची, रेषांची जाण त्याला येणार नाही. त्यामुळे त्याला दुसऱ्या एखाद्या वस्तूचे चित्र काढायला सांगितल्यावर त्याला ते येणार नाही. सर्जनशीलता त्याच्यात आलेली नसेल. किंवा आपणहून एखादे चित्र काढायला सांगितले तरी तो जुनेच काढील वा गप्प बसेल. स्वातंत्र्याचा अभाव. आणि तेच चित्र हुबेहूब काढायचाच प्रश्न असेल तर एखादे कॉपी करणारे यंत्रही त्याच्यापेक्षा ते काम चांगले करू शकेलच. मानवीपणाचा नाश होऊन यंत्रवत अवस्था त्याला प्राप्त झाली असेल. उलट एखाद्या मुलीला रंगपेटी घेऊन मोकळे सोडले तर तिला चित्रकलेची जाण अधिक येईल. तिचा हात केवळ तेच गिरवण्याकरता नव्हे, तर वेगळी वळणे सहजपणे शोधण्याकरता समर्थ होईल. तिला एखादे चित्र हुबेहूब काढता येणारही नाही, पण ती जे काढील त्यात तिचे स्वतःचे काही असेल, उत्फुल्लता असेल. जे येथे खरे आहे तेच तत्त्वज्ञान–आल्जिब्रा किंवा प्रत्येक गोष्टीबद्दल आहे. खरे शिक्षण माणसाला ही क्षमता आणून देते.

आणि यातून आणखी एक मुद्दा स्पष्ट होतो. नवीन शिकण्याची गोष्ट आपल्यासमोर एक चमत्कारिक, विलक्षण वस्तू म्हणून येते. तिच्याविषयी कुतूहल, एक प्रकारची भीती आणि आदरही वाटत असतो – जसा एखाद्या परक्या माणसाबद्दल वाटावा. पण शिक्षणाच्या प्रक्रियेत हा विलक्षणपणा कुठे तरी खोलवर आपल्याला छेडतो, आपण पुढे जाऊन त्या वस्तूला हात लावतो, हाताळतो अन् आपल्यात सामावून घेतो. जणू तिच्यावर विजय मिळवतो व आपल्याला समजेच्या साम्राज्यात तिला खेचून आणतो. त्याचबरोबर त्या वस्तूचे ज्ञान आपल्याला झालेले असते, तिची अंगांगे कळलेली असतात; आणि एका अर्थी आपणच ही अंगांगे तिला प्रदान करून शिकण्यातूनच ती वस्तू घडवलेलीही असते. अनाकलनीय काळ्या गोळ्यातून एक शिल्प घडवलेले असते. ती परकी व्यक्ती आता आपल्यातली झालेली असते. या सबंध प्रक्रियेत एक अचाट आनंद भरलेला आहे. सर्जनाचा आनंद किंवा 'ज्ञानानंद' आहे. जर खरोखर मी काही समजून घेऊ शकलो, आपलेसे करू शकलो तर मिळणारे ते समाधान आहे. मग तो एखाद्या गणिताचा सिद्धान्त असो वा कविता वा तत्त्वज्ञान असो.

बोलता बोलता शिक्षणाला आपण बरेच पैलू आतापर्यंत पाडले आहेत. खरे शिक्षण दुतर्फी असते; ते माणसाला स्वतंत्र व सर्जनक्षम करते; खरोखर माणूस करते. अशा शिक्षणाची प्रक्रिया एकाचवेळी वस्तूचा शोध असते व वस्तूची निर्मिती असते, तिच्या परकेपणावरचा विजय असते, आनंददायी असते.

आज शाळा–कॉलेजात शिकणाऱ्या व शिकवणाऱ्यांना हे वरचे सगळे वाचून परीकथा वाचल्यासारखे वाटेल यात शंका नाही. कारण शिक्षण म्हटले की एक भयंकर कंटाळाच डोळ्यांसमोर उभा रहातो. कंटाळा आणि भीती! काहीही नवे शिकायचे म्हटले, नव्या गोष्टींचा विचार करायचा म्हटला म्हणजे आमच्या अंगावर काटा उभा रहातो. आणि हे समजण्यासारखे आहे. आजच्या शाळा–कॉलेजातल्या शिक्षणामुळे 'शिक्षण' या गोष्टीचा आनंद वगैरे सोडाच पण एक प्रचंड भय आमच्या मनात साचून राहिलेले असते. पार मरेपर्यंत. नवे काही शिकायचे म्हणजे भय वाटते. त्यात आपल्या 'चालले आहे ते ठीक आहे' प्रकारच्या सुरक्षिततेला आह्वान मिळाल्यासारखे वाटते. नवे प्रदेश जिंकून घेण्याऐवजी आहे त्याच कोंडवाड्यात कसेबसे चालवणे बरे वाटते. आजच्या शिक्षणाने आनंदाऐवजी भयप्रद स्मृती देण्यात, स्वातंत्र्याऐवजी गुलामीची आवड बाणवण्यात, सर्जनक्षमतेऐवजी मुकाट दगडपणा रुजवण्यात यश मिळवले आहे निःसंशय.

मार्क्सने म्हटले आहे, माणसाकडे किती आहे त्यापेक्षा तो स्वतः किती आहे त्यावर त्याची किंमत अवलंबून असते. शिक्षणाचा पहिल्यापासून शेवटपर्यंतचा उद्देश माणसाची किंमत वाढवणे हा आहे. त्याला आतून समृद्ध करणे आहे. आजच्या शिक्षणामुळे कदाचित माणूस माया जोडू शकेलही, संपत्ती त्याला मिळेलही, पण तो स्वतः समृद्ध होत होत नाही. स्वातंत्र्याचे, सर्जनक्षमतेचे, अफाट जाणिवेच्या साम्राज्याचे धन त्याला मिळत नाही, आनंद मिळत नाही. आत्मविकास वा स्वतःला समृद्ध करून घेणे शक्य आहे हेच माणूस विसरायला लागला आहे.

दुसऱ्या शब्दांत, माणसासारखे जगणेच शिक्षणाने अशक्य करून टाकल्यासारखे झाले आहे. शाळाकॉलेजे म्हणजे फक्त प्रेतांचे कारखाने झाले आहेत! एकीकडून विस्फारल्या डोळ्यांची, कोवळी मुले सरकावयाची की दुसरीकडून चिपाड झालेल्या सांगाड्यांच्या कवायतीच्या कवायती तयार! त्यात इंजिनियर, डॉक्टर, प्राध्यापक, कारकून – सगळे आहेत. समाजाला उपयोगी पडणारेच आहेत. नाहीत फक्त माणसे – जवळून गेले तरी अंगात वीज खेळावी अशी जिवंत माणसे! आणि याची मुळे आजच्या शिक्षणसंस्थांमध्ये, शिकवण्याचे विषय व पद्धतींमध्ये खोलवर गेलेली आहेत.

तीन प्रकारे त्यांचा विचार करू.

एक तर आजच्या शिकवण्याच्या पद्धती एकतर्फी आहेत. विद्यार्थ्याला टिपून घ्यायला लावणाऱ्या, घासायला लावणाऱ्या आहेत. प्रथम पहिलीत कविता पाठ करायला लावण्यापासून (कविता ही पाठ करण्याची गोष्ट आहे हा अत्याचारी विचार फक्त चरक  झालेल्या पद्धतीतच शक्य आहे!) ते पदवीपरीक्षांमधल्या सिद्धान्तापर्यंत. आम्हाला चित्रकलेसारखा विषयसुद्धा "कावळा झाडावर मांसाचा तुकडा घेऊन बसला आहे, कोल्हा खाली आहे, दूरवर उजवीकडे डोंगर आहे : ४५ मिनिटे" या पद्धतीने शिकवला गेल्याचे स्मरते. कधी मुलांना घेऊन बाहेर गेलेत, कधी रंग नुसते उधळू दिलेत –  हे होत नाही. शास्त्राचे नियमसुद्धा अत्यंत रूक्षपणे पुस्तकातून शिकवले जातात. (विज्ञान म्हणजे एक गद्य गोष्ट आहे हीसुद्धा एक पुराणकथा आहे!) प्रयोगशाळा, विज्ञान–छंद–मंडळे, आणि शिकवतानाही त्या नियमांचा व रोजच्या अनुभवांचा तसेच मोठमोठ्या शोधांचा संबंध जोडून शिकवणे खरे तर प्रभावी ठरेल. खरे पाहता विद्यार्थ्याला स्वतंत्रपणे या नियमांचा 'शोध' लावता येण्याकरता वळण दाखवणे, किंता फार तर बोट धरून त्याला नेणे, एवढेच केले पाहिजे. सध्या म्हणजे तय्यार नियम खिळ्यांनी त्याच्या डोक्यावर ठोकून बसवला जातो. त्यामुळे जिवंत समज कधीच येत नाही. साधी गणिते सोडवणे, दिलेल्या विषयावर निबंध लिहिणेसुद्धा त्याला जड जाते. त्याची सर्जनक्षमताच मारली

जाते. मग स्वतंत्रपणे नव्या अनुभवांना हाताळणे, आपणहून चित्र काढणे, कविता, वा निबंध लिहिणे, तर अशक्यच आणि याचमुळे परीक्षा – पढवणी – गाइड – स्वातंत्र्य व सर्जनशीलतेचा नाश – परीक्षेचे ओझे – हे दुष्टचक्र सुरू होते. कारखान्याचा एक भाग हा असा असतो.

आजच्या एखाद्या अवाढव्य, अद्ययावत शाळेच्या इमारतीत मधोमध जाऊन 'ज्ञानानंद' हा शब्द मोठ्याने ओरडला तर मला वाटते तो कुणालाही चक्क ऐकूच जाणार नाही! शिकण्या–शिकवण्यात आनद असू शकतो हे आज शिक्षक आणि विद्यार्थी दोघे पार विसरून गेले आहेत. उलट विद्यार्थी मारून–मुटकून वर्गात बसतात आणि कधी एकदा शाळा सुटून स्वतंत्र, आनंदी संध्याकाळ सुरू होती आहे ते पहात राहतात! अशा शाळा वा कॉलेजे म्हणजे रूक्ष तुरुंग बनतात. शिकणे म्हटल्याबरोबर कंटाळा अन् धडकी छातीत भरून येतात. वर्ग बुडवणे, लक्ष न देणे, बेशिस्त; सगळ्यांचे हे मूळ आहे. याचाच एक भाग म्हणजे गुरुशिष्य नाते ही सौदेबाजी होते. त्यात ओलावा, आदर शून्य उरतो. एखाद्या सर्जनशील, आनंददायी व्यवहारातच माणसे एकमेकांशी खरे जिव्हाळ्याचे नाते जोडू शकतात. सबंध प्रकियाच तशी नसल्याने हे होऊ शकत नाही. धंदा केल्यासारखे शिक्षक खिळे ठोकठोकत रहातात, अन् मुले घायाळ होऊन सोसत रहातात. आजच्या जगातले कारखान्यातले श्रम, शिक्षण, फार काय सिनेमा–नाटकासारख्या करमणुकीच्या गोष्टींतही हा थंड, पैशांची गणिते करणारा गारठा भरून राहिला आहे. खरी नाती जोडणे अशक्य झाले आहे. युरेका असे ओरडत रस्त्याने नागवे धावण्याचा आनंद आज अशक्य झाला आहे.

लहान मुलाला प्रत्येक वस्तूबद्दल कुतूहल असते; ती हाताळण्यात, शोधण्यात, 'मिळवण्या'त इंटरेस्ट असतो, आनंद असतो. ही क्षमता चरकाच्या प्रत्येक दात्यातून वर जाता जाता नाहीशी व्हायला लागते. अन् त्याचबरोबर आणखीही एक घडते:

मुलाचा माणूस व्हायच्याऐवजी कारकून वा डॉक्टर होतो! समाजाला आवश्यक अशी ही यंत्रे या कारखान्यांमधून तयार होतात. त्यांना मेकॅनिकल इंजिनीयरिंगची वा उच्च तत्त्वज्ञानाची माहिती होते. पण त्याचा त्यांच्या स्वतःशी संबंध काय ते उमगेनासे होते. एम.ए.होऊन नोकरी मिळते व पैसे मिळतात; एवढेच माणसाला कळू लागते. म्हणजे स्वतःला हे शिक्षण समृद्ध करत नाही; उलट फक्त पैसे मिळवण्याची क्षमता आणून देऊन पैशांची व्यापारी तहान वाढवून देते. कामामध्ये व एकंदर जगण्यामध्ये स्वातंत्र्य व सर्जन उरत नाही. उलट काम हे एक प्रचंड ओझे होते व माणूस पैशांचा गुलाम होतो. आतमधून रिता होतो. वर म्हटल्यासारखे चिपाड होतो. कुणी म्हणेल की, मग या विशेष शाखांमध्ये स्पेशलायझेशन नकोच का? तर ते हवे; पण संपूर्ण जीवनशिक्षणातलाच एक पुढे गेलेला तो भाग असायला पाहिजे. आज ती केवळ सूज आहे, किंवा पोकळ मनावरचे पैसे मिळवण्याकरता उपयोगी पडणारे एक गळू आहे. मराठी घेऊन एम.ए. झालेल्या माणसाला कलेची व साहित्याची जिवंत जाण आज बहुतेक वेळा शून्य असते. तत्त्वज्ञान–पंडिताला स्वतःच्या जीवनाचा अर्थ उमगत नसतो. इंजिनियर आपल्या मनाच्या व समाजाच्या प्रचंड यंत्रापुढे अवाक् होऊन बसतो, भेदरून जातो. कारण तो आत अत्यंत दरिद्री झालेला असतो. तो भेदरून, भोवंडून जगत राहतो. बालकवींच्या कवितेवरील पंडितांची मते त्याला पाठ असतात, पण त्याच्या स्वतःच्या हृदयातले काव्य मरून गेलेले असते. तो प्रचंड धरण उभे करू शकतो : पण स्वतः स्वतंत्रपणे उभा राहू शकत नाही. शिक्षणाने केवळ डोक्यांवर विशिष्ट ज्ञानाचे ओझे घेतलेले सांगाडे तयार होतात, अन् त्यांना बाहेरच्या कशाच्या तरी पैसा, देव, सत्ता इत्यादींच्या – आधाराशिवाय उभे रहाता येत नाही.

म्हणजेच, वेगळ्या दृष्टीतून, आजचे शिक्षण अत्यंत गैरलागू झाले आहे. मुलांपुढे वा नंतर मोठ्या माणसांपुढे येणाऱ्या व्यक्तिगत दैनंदिन जीवनाचा व शिक्षणाचा सांधा साफ तुटला आहे. भोताली दिसणाऱ्या जीवनाच्या प्रचंड कोलाहलाचा आणि मनातल्या आशा–आकांक्षा अन् दुःखे व भये यांचा अर्थ लावण्याची ताकद माणसात ते आणू शकत नाही. त्याला पोकळ करून भेदरवून टाकले जात आहे. त्यामुळे सगळे जग व तो स्वतः त्याला अनोळखी, अनाकलनीय झाला आहे. मी एवढा शिक शिक शिकलो पण समाजवादावर त्यात एक अक्षर नव्हते; आणि बाहेर पडतो तर जो तो त्याच्याबद्दल बोलत सुटलेला! ते कळणार कसे? माझ्यापुढे गरिबी, जात, भूक, हिंसा, स्वार्थ यांचे थैमान चालले आहे, पण त्याविषयी मला इतक्या वर्षांत कुणीच सांगितले नाही. माझ लैंगिक उपासमार व त्यातून येणारे प्रश्न सोडवण्याकरता जे लागते ते मला कधीच दिले गेले नाही. 'मी सुशिक्षित आहे' याचा अर्थच मला कळू शकत नाही. पैसे मिळवण्याची एक जादू मला आता येते यापलीकडे त्याला अर्थच नाही. जर मला पैशाचा गुलाम व्हायचे नसेल, समृद्धी जमवायची नसेल, स्वतःलाच समृद्ध व्हायचे असेल, जर मला शुभ्र शीड उभारून मुक्त होऊ पहायचे असेल, आनंदी व्हायचे असेल, तर हे सगळे शिक्षण गैरलागू आणि भंकस ठरत आहे. आणि ह्या आकांक्षा प्रत्येक माणसाच्या, त्याला कळत नसले तरी, असतात. त्याच्या जगण्याचा पाया, आनंदाचे स्रोत, त्याचे मूळ माणूसपणच वर ठरण्याऐवजी एक शाप झाले आहे. निराशेचे, दुःखाचे कारण झाले आहे. इतर अनेक गोष्टींबरोबरच गैरलागू शिक्षण हे ह्याचे एक कारण आहे.

आतापर्यंतचा सगळा विचारही जर असल्या शिक्षणाचाच एक भाग व्हायचा नसेल तर इतक्या खोलवर जाऊन आणखी पुढेही गेले पाहिजे : शिक्षणपद्धती अशी का आहे ते समजून घेऊन, ती बदलायची कशी ते पाहिले पाहिजे. थोडक्यात, निदान हा लेख तरी 'लागू' केला पाहिजे!

जरा डोळे आणखी उघडले तर शिक्षणाचे आजचे स्वरूप अटळ का आहे ते कळू शकते. स्वतंत्र, सर्जनशील, प्रेममय माणूस आजच्या समाजात नको आहे. असा प्रत्येक माणूस त्याचा हाडवैरी आहे. कारण आजचा समाज, माणसाने माणसाच्या केलेल्या पिळवणुकीवर, हिंसेवर, स्वार्थावर आधारलेला आहे. हा त्याचा पाया आहे, अन् यावर कोणताही आघात होऊ न देण्याची व्यवस्था या समाजाने परिपूर्ण केली आहे. माणसाला शून्यवत प्रेत केल्याशिवाय, त्याला पैसा या राक्षसी देवाचा गुलाम केल्याशिवाय, तो पुरता नेस्तनाबूत होत नाही. त्याची सर्जनक्षमता मारून टाकल्याशिवाय त्याची स्वातंत्र्याची तहान संपत नाही. रोगट उत्पादन–व्यवस्थेला जाणारा तडा कसाबसा सांधायचा असेल, पिळवणूक शक्य व्हायची असेल, तर अर्थव्यवस्था, राज्यसत्ता, सामाजिक संस्था – सगळ्यांना विशिष्ट आकार घ्यावा लागतो. त्यांच्यात माणसाचे माणूसपण कसे हरवेल याकडे लक्ष दिले जाते. मालकी हक्क, करार, मालमत्तेचे कायदेकानू किंवा राज्यसत्तेचे अधिकार, लोकशाहीच्या भंकस कल्पना, 'शांतता आणि सुव्यवस्था', किंवा धर्म, जात, कुटुंबसंस्था व लग्नसंस्थांचे नीतिशास्त्र–सगळ्यांतून हे साधले जात असते. शिक्षणव्यवस्था व पद्धती याच प्रस्थापिताचा एक भाग आहे, एक एक हत्यार आहे. प्रेताचे कारखाने चालू राहणे हा आजच्या स्मशानवत जगाची एक मूलभूत आवश्यकता आहे.

आणि शिक्षणक्षेत्रात हे राक्षसी चरक अतिशय कार्यक्षमतेने चालणे शक्य असते. कोवळी असहाय मुलेच खायला मिळत असल्याने सगळे सोपे असते. एकतर्फी शिक्षणाने, छातीतली धुगधुग नष्ट करून त्यांना हवा तो आकार देण्याचे मोलाचे काम शिक्षणात केले जाते! एकीकडे प्रस्थापित समाजरचना कायम रहावी म्हणून मेलेले, गैरलागू शिक्षण असर्जनशील तऱ्हेने दिले जाते व माणसाला पोकळ आणि हतबल करण्यात येते. दुसरीकडे त्याला 'उपयुक्त' ज्ञान देऊन, आजच्या व्यवस्थेला त्याचा उपयोग करून घेणे शक्य करण्यात येते. शिक्षणातून आज माणसाला ज्ञान मिळते हे कोणी नाकारत नाहीच. फक्त हे ज्ञान केवळ पैशांना जोडलेले असते. शरीराच्या गरजा अन् मनाच्याही खोट्या भुका

भागवण्याकरता ते वापरले जाईल असेच असते. त्यामुळे हे ज्ञान ओझे होते. माणसाला आलेले बांडगूळ ठरते. काम ही शिक्षणासारखीच दुःखद गोष्ट ठरते. हे ज्ञान आनंददायी तेव्हाच होईल जेव्हा गरजा भागवणे हा सर्जनशील व स्वतंत्र व्यवहार होईल, रखडपट्टी रहाणार नाही. मग त्यातूनच नव्या गरजा मी निर्माण करू शकेन. अन् त्या अश्या की त्यांचे समाधान हा पुन्हा सर्जनशील व शिकण्याचा अनुभव असेल, पुन्हा नव्या गरजांना जन्म देईल, वगैरे. पण अशी सतत अत्यवस्थ माणसे हा आजच्या व्यवस्थेला सगळ्यात मोठा धोका ठरेल. अशी माणसे निर्माण होऊ नयेत हा शिक्षणाचा आद्य हेतू आहे!

शिक्षणशुद्धी करायची असेल तर हे लक्षात घेतलेच पाहिजे. शिक्षणव्यवस्था व पद्धतीत बदल घडवण्याचा संबंध अपरिहार्यपणे आजचा समाज उलथवून टाकण्याशी लागतो; स्वातंत्र्यावर आधारलेला, पिळवणूकहीन समाज निर्माण करण्याशी लागतो. शिक्षणशुद्धी, सांस्कृतिक क्रांती, अर्थव्यवस्थेमध्ये (खरा) समाजवादी बदल अन् कामगार–शेतकऱ्यांची सार्वभौम राजकीय सत्ताः ही अपरिहार्य साखळी आहे.

आजवर अनेक समित्या नेमून, नवीन नवीन कार्यक्रम आखून, मोठमोठाले शिक्षणतज्ज्ञ अन् प्राध्यापकांनी डोकेफोड करूनही शिक्षणक्षेत्रात मूलभूत शुद्धी आजवर का झाली नाही याचे रहस्य यातच आहे. जणू 'इतिहास – प्रक्रियेचा कावेबाजपणा' या तज्ज्ञ मंडळींना आत कुठे तरी सूचना देतो आहेः ज्या फांदीवर बसला आहात ती तोडू नका; किंवा उघडपणेच हे लोक प्रस्थापित कायम रहावे याकरता कळूनसवरून वागत आहेत. असो.

तर शिक्षणशुद्धीची खरोखर निकड वाटणाऱ्यांनी हा संपूर्ण क्रांतीचा संदर्भ सतत लक्षात ठेवलाच पाहिजे. नपेक्षा जुजबी सुधारणा तरी होतील किंवा आणखी भलत्याच मार्गाला शिक्षणव्यवस्था लागेल. वेगळ्या प्रकारचा साचलेपणा, पारतंत्र्य, अन् रेजिमेंटेशन तिच्यात येईल –– जसे काही ठिकाणी झालेले आहे.

अगदी पहिल्यांदाच आपण म्हटले की शिक्षण हे दुतर्फी असले पाहिजे. स्वतंत्र व सर्जनक्षम माणूस अशाने निर्माण होईल व असाच माणूस खरे शिक्षण घेऊ शकेल. म्हणजे विद्यार्थ्यांनी, आम्ही सगळ्यांनी, स्वतःत बदल घडवून आणण्याचीही गरज आहे. जे या कारखान्यातून सांगाडे होऊन बाहेर पडलेत – आणि असेच बहुसंख्य – ते सोडले तर बाकीचे बाहेरचे आणि या कारखान्यातल्या कन्व्हेअर बेल्टवर बाटल्यांसारखे सरकणारे अगणित अजून जिवंत असलेले विद्यार्थी, या सगळ्यांनी आधी स्वतःला झाडून घेतले पाहिजे. (शिक्षणात मुलांच्या कोवळेपणामुळे व ताजेपणामुळे अत्याचाराला जेवढी सुलभता असते तेढीच बंडाची शक्यताही असते!) आम्हाला पैसा हवा आहे, गुलामी चालणार आहे, आनंद नसला तरी सुख हवे आहे का आम्ही माणसासारखे जगण्याचा हक्क बजावणार आहोत ते आम्ही ठरवायला पाहिजे. आणि जर हा हक्क – हक्क कसला! आनंद, प्रेम, स्वातंत्र्य मिळविण्याची संधी –– आम्हाला हवा असेल तर शिक्षण दुतर्फी आहे हे जाणून आम्ही स्वतःला बदलले पाहिजे. खरे सुशिक्षित व्हायला पाहिजे. या गोष्टीवर भर देण्याची अत्यंत जरूर असून हे केले जात नाही. कुणाही डोळे उघडे ठेवणाऱ्या विद्यार्थ्याला आज ऐंशी टक्के विद्यार्थी या ना त्या स्वरूपात कॉपी करतात हे कळल्यासारखे असून त्याबद्दल एक अक्षर मी आजवर ऐकलेले नाही. आम्हा विद्यार्थ्यांच्या मुलींशी होणाऱ्या वागणुकीविरुद्ध काही नाही! चांगल्या, आस्थेने सर्जनशील तऱ्हेने शिकवणाऱ्या (क्वचित मिळणाऱ्या) शिक्षकांना भयंकर त्रास देताना मी मुलांना पाहिलेले आहे. आपण असे का वागतो हे आम्ही समजून घेतले पाहिजे व सगळी कारणे दूर केली पाहिजेत. त्यातला मोठा भाग शिक्षणसंस्थांचा, पद्धतींचा, अन् बहुसंख्य शिक्षक–प्राध्यापक–तज्ज्ञांचा आहे ही गोष्ट फक्त हेच ढोंगी लोक नाकारतील. पण काही भाग विद्यार्थ्यांचा आहे हेही खरे

आहेच. आतून पेटलेली शिस्त, निष्ठा, वाईटाचा संताप (किंवा दुसऱ्या शब्दांत स्वातंत्र्य, उत्फुल्लता व चांगल्याची तहान) या खऱ्या बदलाला, शुद्धीला, क्रांतीला आवश्यक आहेत.

शिक्षणप्रक्रिया दुतर्फी असते याचा दुसरा अर्थ असा : शिकताना जसा मी स्वतंत्रपणे, सर्जन करत असतो तसाच सबंध शिक्षणव्यवस्थेलाही मी 'शोधले' पाहिजे, घडवले पाहिजे. दुसऱ्या शब्दात आणि नेहमीच्या शब्दांत, शिक्षण काय व कसे असावे याबद्दल मला अधिकार असले पाहिजेत. एखादे सामुदायिक शेत राबवताना मी स्वार्थी, सौदेबाजी भावनांवर मात केली पाहिजे (कॉपी केली नाही पाहिजे) हे जितके खरे, तितकेच मला या सामुदायिक शेताच्या घडणीवर, कारभारावर, प्रत्यक्ष नियंत्रणात हिस्सा मिळाला पाहिजे हेही. कारण त्याशिवाय आपुलकी अन् हे माझे घरचे शेत आहे, असे मला वाटणार नाही. आणि माणूस घराच्या भिंतीत जेवढा स्वतंत्र व निर्मितिक्षम असतो तेवढा बाहेर नसतो. थोडक्यात, विद्यार्थ्यांना विद्यापीठे, कॉलेजे, शाळा–सगळ्यांच्या कारभारात, शिकवण्याच्या पद्धती ठरण्यात, लागू आणि समावेशक शिक्षणक्रम नेमण्यात, शिक्षक व प्राध्यापकही नेमण्यात (आईबापांनी ठरवलेली लग्ने आता बस्स झाली!) अधिकार मिळाले पाहिजेत. जोपर्यंत सबंध समाज बदलत नाही तोपर्यंत विद्यार्थ्यांचा हा 'सहभाग' व्यवस्थेशी संघर्षाचा, तेढीचाच राहणार हे उघड आहे. पण हे पत्करायचे का नाही, समाजात बदल घडू द्यायचा की नाही – मग तो कुठपर्यंतही आपल्याला घेऊन जावो – हा निर्णय आजच्या प्रस्थापिताने घ्यायचा आहे. लोकशाहीच्या अन् हिरव्या, पिवळ्या, पांढऱ्या क्रांतीच्या ते गप्पाच मारणार आहेत का या संघर्षाला तोंड फुटू देणार आहेत – ते त्यांनी ठरवायचे आहे.

आपल्यापुरते बोलायचे तर, माझ्या मते प्रस्थापिताचा निर्णय कोणता असेल हे ठरलेले आहे! राज्य चालवणारे, धंदा करणारे, युनिव्हर्सिट्या व शाळा चालवणारे लोक मूर्ख असले तरी स्वतःला खलास करण्याइतके मूर्ख नाहीत. म्हणून हे आपणच करायचेय – या प्रेतांच्या कारखान्यातल्या यंत्रांत चिरडल्या जाणाऱ्या प्रत्येकाने. तिथल्या तिथे चक्राला खांदा रेटून, मिठी मारून, लोंबकळून हे यंत्र थांबवण्याचा व उलटे फिरवण्याचा निकराचा प्रयत्न करून. विधायक सूचना करून, नव्या प्रकारच्या शिक्षणाकरता प्रत्यक्ष रोजच्या प्रश्नांना उत्तरे देऊन, प्रयोग करून पहायला सांगून – आणि हे न कराल तर हे यंत्र उध्वस्त करू, बंद पाडू असा लढाऊ पवित्रा घेऊन! या सूचनांचा, 'विद्यार्थ्यांच्या मागण्यां'चा सहानुभूतिपूर्वक विचार करण्याची आश्वासने हजारो वर्षे आम्ही ऐकत आलो आहोत. पार शंबुकाच्या तपाच्या अधिकाराच्या मागणीपासून ते आजवर. हे असे होणार नाही. सुधारणावाद्यांचा काळ आता गेला आहे. आता समोर सरळ, निर्दय, कठोर संघर्ष आहे. म्हणजे असे: प्रस्थापित तर काही बदलणारे नाहीत, आणि फार तर काही सुधारणा करण्यापलीकडे तर नाहीच. आपली भूक तर ही अशी वाढलेली, संबंध बदलू पहाणारी. मग काय करायचे? वर म्हटल्याप्रमाणे खांदा रक्ताळेपर्यंत चरकाच्या दात्याला रेटत जायचे. सगळ्यांनी एकदम. न हलता–परत, दुसरा दाता, दुसरा चरक. पण हे सगळे आजच्या शिक्षणसंस्थांमध्ये राहूनच, स्वतःला बदलत, घडवत, शिकवत करावयाचे आहे.

जरी अंतिम उद्देश या व्यवस्थेला 'खांदा देण्या'चा असला तरी आज ते शक्य नाही. म्हणून त्रागा व चिडचिड न करता, थंड, धारदार, संतापी निर्धार जागा ठेवायचा, अन् आजच्या संस्थांमधून लाँग मार्च करत जायचे. मिळेल तिथे हिसडा मारायचा, शक्य तर यंत्र उलटे फिरवायचे, थांबवायचे; शत्रू जोरात आला तर पाय काढता घ्यायचा. वळण घेऊन पुन्हा मार्च सुरू ठेवायचा. या सगळ्याने आमूलाग्र शिक्षणशुद्धी वगैरे होणार नाही हे मात्र पक्के ध्यानात ठेवायला पाहिजे. काहीबाही सुधारणा होतीलही. पण मूळ पाया माणसाला प्रेत बनवण्याची प्रक्रियाच राहील. या लाँग मार्चमधून हळूहळू आपण वाढत जाऊ. बाहेरही सगळीकडे सगळ्या क्षेत्रांत असे लोक वाढतील. कन्व्हेअर बेल्टवरच्या बाटल्या रक्तबंबाळ

होतील, पण त्यांच्यात दारू ठासली जाईल. अन् कधी तरी मग स्फोटक हालचाली त्यांच्यात सुरू होतील. कारखाना वाळवीने पोखरल्यासारखा कोसळायला लागेल. दुसरीकडे नवीन निर्माण होऊ लागेल.

सारांश, खऱ्या अर्थी शिक्षणशुद्धी खरोखर तेव्हाच होईल, जेव्हा देव, धर्म, पैशांची गुलामी, अन् हिंसेवर आधारलेले राज्यही कोसळून पडेल. शिक्षणक्षेत्रातला लढा त्यांच्याशी निगडित आहे. आणि दुतर्फी आहे: पलीकडचे बदलताना, अलीकडचे ही बदलल्याशिवाय अशक्य आहे. संपूर्ण क्रांतीकरता अक्षरशः अंतर्बाह्य क्रांती आवश्यक आहे.

या सर्व विवेचनातून अनेक मुद्दे, उपमुद्दे पुढे येतात. त्यांचा विचार आणि त्यावर आधारलेल्या मागण्या व लढ्याच्या योग्य पद्धती सर्जनशीलतेने निर्माण करायला लागतील. एरवी आम्ही आजच्या शालेय शिक्षणाने जसे आंधळे झालोय तसे बाहेरच्या पक्षाबिक्षांच्या प्रस्थापितांकडून 'शिकून'ही आंधळेपणाने वागत राहू. असे आजवरच्या युवक व विद्यार्थी चळवळींचे चाललेले दिसते आहेच. कुठे अवास्तव मागण्या, कुठे मूल्यविचार नसलेल्या, 'कॉपी करू द्यावी' यासारख्या भंकस मागण्या, कुठे निरर्थक हसा, तर कुठे शांततामय मार्ग अन् साधनशुचितेचा अनाठायी ध्यास, कुठे पोथीबाज विश्लेषणे व मार्ग, तर दुसरीकडे दिशा अन् कणाच न उरलेल्या गुळगुळीत अन् मुळमुळीत 'लढाऊ' संघटना. या सगळ्यात आमची वाताहत होत आहे. ही कोंडी फोडण्याच्या दृष्टीने त्या लेखातील एकंदर शिक्षणाविषयी समज उपयोगी पडेल असे वाटते. मग अनेक सुधारणा व मागण्यांचा आराखडा करता येईल, व सबंध शिक्षणव्यवस्थेचे कुजलेले रहस्य जाणून घेऊन, विशिष्ट परिस्थितीत लढ्याचे मार्गही येतील. उदाहरणार्थ, आपल्या विवेचनात क्रमाने येणाऱ्या मागण्या अशा होऊ शकतात : पुरवणी–वाचन, सहली, समाजकार्य, श्रमकार्य वगैरेंतून प्रत्यक्ष जगाशी व श्रमिकांशी जास्त संबंध; प्रयोग, सिनेमा, इत्यादींवर जास्त भर; घोकंपट्टी आणि स्वतंत्र बुद्धी व सर्जनशीलतेच्या अभावावर आधारलेल्या परीक्षापद्धतीत बदल; केवळ 'पैसा–उपयुक्त' ज्ञानाबरोबरच एकंदर जीवनाविषयी – धर्म, जातीयता, समाजवाद, क्रांतिकारक विचार यांविषयी – अभ्यासक्रमात विषय; इंटर–डिसिप्लिनरी आणि इंटिग्रेटेड अभ्यासक्रम; शिक्षक–विद्यार्थ्यांचा मानवी पातळीवर अधिक संबंध, लैंगिक बाबींत व खऱ्या अर्थी शिक्षण; कॉपी वा इतर वाईट गोष्टींबद्दल कडक शिक्षा करण्यासाठी विद्यार्थिसमित्या व त्यांना योग्य अधिकार; अभ्यासक्रम, शिकवण्याच्या व मूल्यमापनाच्या पद्धती व नेमणुका आणि सर्वसाधारण कारभार यात विद्यार्थ्यांना निर्णायक सहभाग; ग्रंथालये व प्रयोगशाळा इत्यादी सोयी व मोफत शिक्षण इत्यादी. आणि मग व्यापक क्रांतीच्या संदर्भात उद्भवणाऱ्या विद्यापीठांचे स्वातंत्र्य व पावित्र्य, बेकारीविरुद्ध उपाययोजना, राजकारणात भाग घेतल्याबद्दल आकसाला प्रतिबंध, जातीयतेला विरोध, इतर व्यापक सामाजिक, आर्थिक व राजकीय मागण्या इत्यादी.

प्रत्येक ठिकाणची परिस्थिती, विद्यार्थ्यांची व व्यवस्थेची तयारी, त्या गावातले सामाजिक व राजकीय जीवन, इत्यादींची नीट कल्पना करून घेऊन मग मागण्या, संघटनेचे अंतर्गत स्वरूप व लढ्याचे मार्ग, आणि डावपेच तपशीलवार ठरवावे लागतील. पण या पुढच्या गोष्टी, आणि प्रत्यक्षात कृतीने सोडवण्याच्या. या सगळ्यांमध्ये मूळ उद्देशाचे – स्वतंत्र, सर्जनक्षम, आनंदी, माणसासारखा माणूस घडवण्याचे व त्याला अनुरूप अशी व्यवस्था घडवण्याचे – विस्मरण मात्र होऊ देता कामा नये. कारण याच सततच्या सर्वंकष भानातून व झगड्यातूनच एक अफाट बहरलेले स्फोटक स्वप्न अन् थंड, धारदार प्रचंड संतापाची सुरी ही आमची हत्यारे शाबूत रहाणार आहेत. आजच्या शिक्षणामुळे बाकी गमावण्यासारखे काही आपल्याकडे नाहीच.

(*हजार हातांचा आक्टोपस* मधून साभार)

sudheerbedekar@gmail.com

# जनआंदोलनं – साधीसरळ गुंतागुंत

*सुनील तांबे*

चळवळ विकास खाउजा

महानदीवरील हिराकूड धरण संबळपूर विद्यापीठाच्या जवळ आहे. हिराकूड धरण प्रकल्पामुळे दीड लाख एकर जमीन ओलिताखाली आली. त्याशिवाय काही शे मेगावॅट विजेची निर्मिती होते. पण धरणाच्या परिसरातील आदिवासींच्या गावात वीज पोचलेली नाही. संबळपूर विद्यापीठाच्या एका प्राध्यापकाने एका गावकऱ्याला ह्यासंबंधात छेडलं. तर आदिवासी उत्तरला, "दिव्याखाली अंधार असतो." पण त्या अंधारातही अवकाश असतो. तो दिसत नाही. विकासाची संकल्पना सरळ–सोपी असते कारण ती दिव्यासारखी दिसते. विकासाची संकल्पना गुंतागुंतीची असते कारण त्या दिव्याखालच्या अंधारातला प्रदेश आपल्या नजरेला दिसत नाही. त्या आदिवासीचे उद्‌गार प्राध्यापकाला दार्शनिक वाटले.

विकास म्हणजे काय, ह्याची उकल करताना त्या प्राध्यापकानं म्हटलं, "मानवी श्रम आणि ज्ञान ह्यांच्या संयोगातून उत्पादक शक्तींचा विकास होतो. माणसाच्या जीवनविषयक संकल्पना आणि विश्व ह्यांच्या आकलनातून ज्ञान निर्माण होतं. त्यामुळे ज्ञानविषयक धारणेतून विकासप्रकल्प जन्म घेतो. त्यामुळे धरण असो की कारखाना वा शाळा, ह्यामुळे विकास झाला आहे की नाही, हे शोधायचं असेल तर त्या प्रकल्पाला जन्म देणारी जी ज्ञानविषयक धारणा आहे, तिचा स्वीकार त्या परिसरातल्या लोकांनी केला आहे का असा प्रश्न विचारायला हवा. म्हणजे स्थानिक लोकांच्या जीवनविषयक धारणांशी तो प्रकल्प एकजीव झाला आहे का, स्थानिक लोकांच्या जीवनधारणा त्या प्रकल्पाने बदलल्या आहेत का, स्थानिक लोकांच्या ज्ञानविषयक, जीवनविषयक धारणा प्रकल्पात अनुस्यूत असलेल्या ज्ञानविषयक धारणांशी मिलाफ करत आहेत का अशा प्रश्नांची उत्तरं शोधायला हवीत."

'अभिवृद्धी वेलुगू नीडालू' ह्या शीर्षकाचा (विकास – प्रकाश आणि छाया) प्रा. आर्. एस्. राव ह्यांचा हा निबंध 1990 साली तेलूगू सोसायटीने प्रकाशित केला. प्रा. राव ही मार्क्सवादी विचारांची एक नावाजलेली व्यक्ती. मार्क्सवादी–लेनिनवादी आणि त्यानंतर माओवादी सशस्त्र आंदोलनाचे ते चिकित्सक अभ्यासक होते. 90च्या दशकातील भारतातील विविध जनआंदोलनांनी दिव्याखाली असलेल्या अंधारातील अवकाशाला प्रकाशमान करण्याचा अथक प्रयत्न चालवला आहे.

धरण प्रकल्पामुळे होणाऱ्या विस्थापितांचा प्रश्न मुळशी धरणापासून, म्हणजे स्वातंत्र्य आंदोलनातही उपस्थित झाला होता. महाराष्ट्रात धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रश्न बाबा आढाव, एन्. डी. पाटील इत्यादींनी यशस्वीपणे लढवलाही होता. सेनापती बापट असोत, की बाबा आढाव; वा गणपतराव देशमुख वा एन. डी. पाटील; ह्यांपैकी कोणी धरणांना विरोध केला नव्हता. धरणामुळे जमीन ओलिताखाली येते, शेती उत्पादनात वाढ होते, विकास होतो हे त्यांना मान्य होतं. पण विस्थापितांचा प्रश्न सोडवायला हवा, एवढंच ते अधोरेखित करत होते. त्यामुळे विकासाच्या संकल्पनेला त्यांचा विरोध नव्हता. 80च्या दशकात उभ्या राहिलेल्या 'नर्मदा बचाव आंदोलना'ने आधुनिक विकासाच्या संकल्पनेला आव्हान दिलं. विकास म्हणजे काय, कोणाचा विकास, विकासासंबंधीचे निर्णय कोण घेतं, ते निर्णय कसे घेतले जातात, धरण प्रकल्पाचा आराखडा बनवताना मांडलेले लाभ–हानीचे आकडे कसे फसवे असतात, धरण प्रकल्पामुळे विस्थापित होणाऱ्यांचे मानवी हक्क कसे पायदळी तुडवले जातात, जंगल म्हणजे केवळ लाकूडफाट्याची कोठारं नाहीत की

प्राणवायूचे कारखाने नाहीत, तर अनेक मानवी समूह जंगलांवर अवलंबून असतात – त्यांच्याकडे जमीन मालकीच्या नोंदी नाहीत म्हणून त्यांना देशोधडीला लावण्याचा हक्क सरकारला कसा नसतो, किंवा, लोकशाही राज्यकारभाराची चौकट लोकांची मुस्कटदाबी कशी करते, असे अनेक मुद्दे या आंदोलनाने ऐरणीवर आणले. नर्मदा बचाव आंदोलन फक्त नर्मदा खोऱ्यापुरतं मर्यादित राहिलं नाही. मुंबई, पुणे, दिल्ली, केरळ, बंगलोर, अमेरिका, जपान, इथेही नर्मदा बचाव आंदोलनाचे गट स्थापन झाले. ह्या आंदोलनाने विकास प्रकल्पाच्या विरोधात लढताना सामाजिक–आर्थिक न्यायाची मागणी करणाऱ्या, समता आणि समृद्धीची सांगड घालू पाहणाऱ्या विविध संघटना, गट, व्यक्ती ह्यांना आकर्षित केलं. 1989 साली हरसूद येथे झालेल्या नर्मदा बचाव आंदोलनाच्या कार्यक्रमाला केवळ नर्मदा खोऱ्यातील लोक उपस्थित नव्हते, तर देशभरातील सुमारे 350 संघटना, कार्यकर्त्यांचे गट, कलावंत इत्यादींनी हजेरी लावली. विस्थापन, विनाश, विषमतेला नकार आणि नव्या विकासाची सुरुवात, हा हरसूद अधिवेशनाचा जाहिरनामा होता.

हरसूदच्या अधिवेशनानंतर देशातील विविध जनआंदोलनांना एकमेकांशी समन्वय साधण्याची गरज भासू लागली. त्यातून 'जनविकास आंदोलन' ह्या समन्वयाची सुरुवात झाली. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या विरोधातील आझादी बचाव आंदोलन, हिमालय बचाव आंदोलन, नॅशनल फिश वर्कर्स फोरम, भोपाल गॅस पीडित महिला उद्योग संघटना, मानव वाहिनी, गंगा मुक्ती आंदोलन, समाजवादी जन परिषद, चिल्का बचाओ आंदोलन, नर्मदा बचाव आंदोलन, जनविकास आंदोलन ह्यांनी जनआंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय अर्थात 'नॅशनल अलायन्स ऑफ पीपल्स मूव्हमेंट' ह्या व्यासपीठाची स्थापना केली.

विश्व बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी ह्यांचा 'स्ट्रक्चरल एडजस्टमेंट प्रोग्रॅम' (एस्.ए.पी) भारताने स्वीकारला. अर्थव्यवस्थेत संरचनात्मक बदलाला सुरुवात झाली ती 1990 नंतर. हे धोरण विकासाभिमुख की उद्योगाभिमुख हा वादाचा वा चर्चेचा प्रश्न आहे. तूर्तास तो बाजूला ठेवूया. परंतु ह्या धोरणामुळे गुंतवणूक, भांडवलाची मालकी, नफ्याची वाटणी, विविध खनिजांच्या खाणींसंबंधातील धोरण म्हणजे जमिनींचे मोठे पट्टे भाडेपट्टीनं देणं वगैरे, बंदराचं खाजगीकरण अशा अनेक बदलांना सुरुवात झाली. 1995 ते 2011 ह्या काळात, फक्त ओडीशा राज्यातच 50,276 एकर जमीन विविध उद्योग प्रकल्पांसाठी राज्य सरकारने संपादित केली. त्याशिवाय रस्ते, रेल्वे इत्यादी पायाभूत सुविधांसाठी संपादित केलेली जमीन वेगळी. खाणींसाठी खाजगी उद्योगांना भाडेपट्टीनं दिलेली अडीच लाख एकर जमीन वेगळी. रोजगाराचं म्हणायचं तर 1960 साली उभ्या राह्यलेल्या राऊरकेल्यातील पोलाद प्रकल्पाने 34 हजार लोकांना थेट नोकऱ्या दिल्या होत्या. 12 दशलक्ष टन पोलाद उत्पादनाचा आर्सेलर–मित्तल प्रकल्प फक्त साडेपाचशे लोकांनाच थेट नोकऱ्या देणार आहे. म्हणजे ज्यांची जमीन आणि जगण्याची संसाधनं हिरावून घेण्यात आली, त्यांना ह्या प्रकल्पांमध्ये विकासाची संधी नाही. एकट्या ओडीशा राज्यातील जमीन संपादनाचा तपशील पाह्यला, तर देशामध्ये काय घडत असावं ह्याचा अंदाज येतो. इतक्या प्रचंड प्रमाणावर जमीन आणि नैसर्गिक संसाधनं खाजगी उद्योजक वा बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या हाती गेल्याने लोकांच्या जगण्याच्या हक्कावर गदा आली. त्यातून विविध जनआंदोलनं उभी राहिली. स्थानिक नेते आणि कार्यकर्ते ह्यांची निष्ठा, बांधिलकी, सर्जनशीलता आणि संघटन कौशल्य, ही या आंदोलनांची शक्ती होती. त्यांचं स्वरूप अर्थातच इश्यू बेस्ड—म्हणजे एखाद्या विशिष्ट प्रश्नाची तड लावू पाहणारं होतं. मात्र आंदोलनांत विविधता एवढी प्रचंड, की त्यातून ह्या आंदोलनांची विचारधारा संकीर्ण स्वरुपात का होईना, पण स्पष्ट होते.

देशातील शेतकरी आणि शेती व्यवस्थेच्या आजच्या स्थितीला जबाबदार असणाऱ्या विविध आंतरराष्ट्रीय घटकांची आणि त्यावरील उपयांची नोंद जनआंदोलनांच्या 'राष्ट्रीय समन्वया'च्या एका बैठकीत पुढील शब्दांत घेण्यात आली:

*'तिसरं सहस्त्रक हे जागतिकीकरणामुळे परिघावर फेकल्या गेलेल्या शेतकरी, शेतमजूर, मच्छिमार समूह, आदिवासी समूह, कारागीर, दलित व इतर समूहांचे असेल. जागतिकीकरणाच्या आव्हानाचा सामना करीत जमीन, पाणी व जंगल यांचं स्वतःच व्यवस्थापन करून आपण दृढ होत जायचं आहे. जनुक अभियांत्रिकी व पेटंट्सपासून मुक्त समाज निर्मितीचं आव्हान आपण स्वीकारायचं आहे. आपली पारंपरिक विद्या व जैवविविधता इतरांबरोबर उपयोगात आणायची आमची परंपरा राहत आली आहे. जगातील कुणालाही तिच्यावर नियंत्रण ठेवू देण्यास आमचा विरोध आहे. भांडवलदारांच्या विरुद्ध आपले लोकशाही अधिकार आपणांस सुरक्षित ठेवायचे आहेत. या भांडवलदारांच्या नफ्याच्या चक्राविरुद्ध सामाजिक न्याय व समानतेची लोककेंद्री मूल्ये आपण समजून घेऊ व भारताच्या सध्याच्या घटनेतील लोकशाहीसाठीचा अवकाश वापरून आपली सार्वभौमता आपण ठसवू. आपल्या देशातील सत्ताधाऱ्यांनी देशातील बीज, वनस्पतींची समृद्ध जैवविविधता बड्या कंपन्यांच्या हाती देण्याची तयारी चालवली आहे. त्यासाठी वेगवेगळे कायदे करून सरकार इथल्या जैवविविधतेचा ताबा घेणार आहे. हे रोखण्यासाठी देशभरातील स्थानीय समुदायांनी आपआपल्या जैव संसाधनांवरील अधिकारांची घोषणा करावी.'*

जनआंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय (ज.रा.स.) ही एक संघटना नाही. तर विविध संघटना आणि आंदोलनांचं ते एक व्यासपीठ आहे. जनआंदोलनांनी जे प्रश्न उपस्थित केले आहेत ते शासनसंस्थेशी संबंधित आहेत. शासनसंस्थेत – कायदा, धोरण निश्चित करणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे, ह्यामध्ये बदल करण्यासाठी आंदोलनांचा रेटा हवाच. 2011 साली अण्णा हजारे ह्यांनी सुरू केलेल्या जनलोकपाल कायद्याच्या मागणीसाठी जे आंदोलन सुरू झालं, त्यामध्ये ज.रा.स. चे अनेक पदाधिकारीही सहभागी झाले. ह्याच आंदोलनातून पुढे 'आम आदमी पार्टी' ('आप') स्थापन झाली. भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाने केवळ 'जनलोकपाल विधेयक' ह्याच मागणीवर लक्ष केंद्रित केलं. वस्तुतः भ्रष्टाचाराच्या विरोधातील लढाई तीन आघाड्यांवर केली पाहिजे. पहिली आघाडी: अर्थ–राजकीय व्यवस्था. 1991 नंतर जे काही संरचनात्मक बदल भारतीय अर्थ–राजकीय व्यवस्थेत झाले, त्यामुळे मंत्री आणि नोकरशहांच्या हाती अमर्याद सत्ता आली. त्यामुळे गैरव्यवहारांच्या संख्येत आणि पटीत प्रचंड वाढ झाली. 'टू–जी' घोटाळा, कोळसा खाणवाटप घोटाळा, राष्ट्रकुल क्रीडास्पर्धांच्या आयोजनातील घोटाळा, 'राडिया टेप्स्'ने बाहेर आणलेलं कॉर्पोरेट–राजकारणी आणि पत्रकार ह्यांचं गूळपीठ, ह्यावरून हा मुद्दा स्पष्ट व्हायला हवा. दुर्दैवाने अण्णा हजारेंचं आंदोलन फक्त कायद्यावर केंद्रित झालं. पुढे त्या आंदोलनातून निर्माण झालेल्या 'आप'ने दिल्ली विधानसभा निवडणुकांमध्ये यश मिळवल्यानंतर विविध जनआंदोलनांना आशेचा किरण दिसू लागला. समाजवादी जनपरिषदेचे नेते आणि जनआंदोलनांच्या राष्ट्रीय समन्वयाच्या प्रक्रियेत सुरुवातीपासून सामील असलेले योगेंद्र यादव, हे 'आप'मध्ये सामील झाले. जनआंदोलनांना न्यायालयीन कामकाजात नेहमीच मदत करणारे, त्यांचे खटले लढवणारे प्रशांत भूषण हे कायदेतज्ज्ञ आधीपासूनच 'आप'मध्ये सक्रीय होते. अरविंद केजरीवाल ह्यांच्या नेतृत्वाखाली ह्या पक्षाने नवी दिल्लीतील शेकडो तरूणांना अतिशय पारदर्शीपणे निवडणुका कशा लढवता येतील, ह्याचा धडा घालून दिला. 'क्रोनी कॅपिटॅलिझम' च्या विरोधात केजरीवाल ह्यांनी स्पष्ट भूमिका घेतली. काँग्रेस आणि भाजप ह्यांच्यापासून वेगळा पर्याय उभा करण्याची भाषा ते करू लागले. त्यामुळेही जनआंदोलनांच्या आकांक्षांना 'आप' साद घालू लागली. 2014 च्या लोकसभा निवडणुकांमध्ये 'आप'च्या वाट्याला केवळ चार जागा आल्या. त्याही पंजाबातून. जनआंदोलनांच्या ज्या कार्यकर्त्यांनी वा नेत्यांनी निवडणुका लढवल्या, ते सपशेल पराभूत झाले. त्यानंतर 'आप'मध्येही धुसफूस सुरू झाली. अर्थातच जनआंदोलनांचे नेते–कार्यकर्ते पुन्हा आपआपल्या आंदोलनात गुंतले.

'हे रोखण्यासाठी देशभरातील स्थानीय समुदायांनी आपआपल्या जैव संसाधनांवरील अधिकारांची घोषणा करावी', असा आदेश वा आवाहन करून प्रश्न सुटत नसतो; त्यासाठी संघटना लागते. तरच देशव्यापी कार्यक्रम अंमलात येऊ शकतो. जनआंदोलनांच्या कार्यकर्त्यांना देशव्यापी सोडाच पण राज्यव्यापी संघटना उभारण्याचीही गरज वाटत नाही. भारत सरकार, प्रस्थापित राजकीय पक्ष, जागतिक भांडवलशाही इत्यादींच्या विरोधात संघटना न उभारता जनलढा कसा उभारायचा, ह्याची स्पष्टता जनआंदोलनांच्या राष्ट्रीय समन्वयाकडे नाही. साधी राहणी, उच्च विचारसरणी ह्याला विरोध असण्याचं कारण नाही पण व्यक्तीच्या आकांक्षांना जनलढ्यात किंवा संघर्षात काही स्थान आहे की नाही? ज्याच्याकडे सायकल असते त्याला स्कूटर घ्यावीशी वाटते. ज्याच्याकडे स्कूटर आहे त्याला चारचाकी हवीशी वाटते. ह्या साध्या आकांक्षांना स्थान नसलेली विचारसरणी कितीही रोमँटिक, आदर्शवादी, आकर्षक असली, तरी गोरगरीबांना कशी भुरळ घालेल? राजकीय–सामाजिक आंदोलन चालवताना पुढच्या पाच, दहा, पंधरा, पंचवीस वर्षांचा वेध घ्यायला हवा आणि त्यानुसार कार्यक्रम आखायला हवा. अर्थात संघटना असेल तर हा प्रश्न निर्माण होतो. संघटना नाही आणि सगळा आदर्शवादाचा, संघर्षाचा, विचारधारेचा कारभार असला, की कार्यकर्ते वगळता बाकीचे अनेक लोक केवळ प्रश्नापुरते संघटना वा आंदोलनाशी जोडले जातात आणि निवडणुकांमध्ये वेगवेगळ्या राजकीय पक्षांचे कार्यकर्ते बनतात. रोज उठून आंदोलन करणं कष्टकरी माणसाला परवडणारं नसतं आणि शक्यही नसतं. कारण त्याला जगायचं असतं. परिणामी, आंदोलनांचा जोर नंतर ओसरत जातो. अमरावती जिल्ह्यात सुदामकाका देशमुख नावाचे एक कम्युनिस्ट नेते होते. त्यांच्या चारित्र्याचा आणि चरित्राचा करिष्मा मोठा होता. विधानसभा, लोकसभेच्या निवडणुका त्यांनी यशस्वीपणे लढवल्या. त्यांच्या निधनानंतर अमरावती जिल्ह्यात कम्युनिस्ट पक्ष आहे, हे कोणत्याही निवडणुकीत समजत नाही. जनआंदोलनांची मदार अशा व्यक्तींवर आहे. त्यातल्या काही व्यक्ती थकतात, भुलतात तर काही व्यक्ती उतणार नाही – मातणार नाही – घेतला वसा टाकणार नाही, ह्या निष्ठेने कार्य करत राहतात. अशा व्यक्तींबद्दल समाजात आदर असतो. दिव्याच्या प्रकाशात उजळून निघालेल्या लोकांना अंधारातलं अवकाश शोधणाऱ्या लोकांबद्दल आदर असतो, आपलेपणा वाटतो आणि अनेकदा त्यांच्या मनात अपराध भावनाही असते.

विकासाच्या प्रकाशानं जनआंदोलनं आणि त्यांचे कार्यकर्ते दिपून जात नाहीत. विकास प्रकल्पामुळे विस्थापित होणाऱ्यांचा 'क्रिटिकल मास' आंदोलन उभारतो. त्या आंदोलनाला वैचारिक दिशा देण्याचं आणि त्यांचे हौसले बुलंद करण्याचं कार्य, जनआंदोलनं आणि त्यांचे कार्यकर्ते करतात. ह्या अंगाने जनआंदोलनं आणि कार्यकर्ते हे प्रकरण साधंसरळ आहे. मात्र लढा यशस्वी होण्यासाठी शासनसंस्थेचं (मंत्रिमंडळ, कायदेमंडळ आणि नोकरशाही) स्वरूप आणि ते बदलण्याची व्यूहरचना ह्यामध्ये त्या 'क्रिटिकल मास'चं स्थान निर्णायक नसतं. त्यासाठी राजकारणाच्या मुख्य प्रवाहात यावं लागतं आणि ते करायचं तर जनआंदोलनांपासून दूर जाण्याशिवाय पर्याय नसतो. जनआंदोलनं आणि त्यांचे कार्यकर्ते, हे प्रकरण इथं गुंतागुंतीचं बनतं.

(*ऐसी अक्षरे, दिवाळी अंक, 2014* च्या सौजन्याने)

●●●

# डावा आदर्शवाद आणि खुली बाजारपेठ

*मिलिंद मुरुगकर*

चळवळ विकास खाउजा

'चळवळी' या विषयावर लिहायचा विचार करत असतानाच नर्मदा बचाव आन्दोलनाच्या 'हरसूद मेळाव्या'ला पंचवीस वर्षे पूर्ण झाल्याची आठवण करून देणारी मेल आली आणि त्यासोबतच त्या मेळाव्याचे चित्रीकरण असणारी व्हीडीओ क्लीप देखील. ही क्लीप पाहताना हरसूदच्या मेळाव्याच्या आठवणी ताज्या झाल्या. हरसूद हे गाव नर्मदेवरील धरणप्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात येणारे गाव. मेधा पाटकरांच्या आगळ्यावेगळ्या शैलीच्या अभूतपूर्व नेतृत्वाखालील नर्मदा बचाव आंदोलनाने नर्मदा प्रकल्प, हरसूद ही नावे जगाच्या काना कोपऱ्यात पोहचवली होती. येथे हे विसरता कामा नये की पंचवीस वर्षापूर्वी अजून आजची माध्यमक्रांती व्हायची होती. आणि तरीही नर्मदा बचाओ आंदोलनाने ही किमया साधली होती.

हरसूदची चित्रफीत पाहताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवत होती. या मेळाव्याला ढोबळ मानाने ज्यांना डावे म्हणता येतील असे सर्व विचारप्रवाह एकत्र आले होते. त्यात पर्यावरणवादी , गांधीवादी जसे होते तसेच जहाल अति डाव्या संघटना देखील होत्या यातील सर्वच लोकांना मेधा पाटकर मांडत असलेली पर्यायी विकासाची संकल्पना मान्य होती असे नाही. त्यांचा नर्मदा बचाओ आंदोलनाला असलेला प्रतिसाद प्रामुख्याने भावनिक होता.आणि तो एका पोकळीतून निर्माण झालेला होता. ती पोकळी दोन कारणांनी निर्माण झाली होती. एक कारण आंतरराष्ट्रीय होते आणि दुसरे देशपातळीवरील. आंतरराष्ट्रीय पातळीवर साम्यवादाच्या आकर्षणाला ओहोटी लागली होती. (हरसूदच्या मेळाव्या नंतर केवळ दोन महिन्यातच बर्लिनची भिंत कोसळली.आणि दोन तीन वर्षात सोव्हियेत युनियनचे विघटन सुरु झाले). या घटनांचा प्रचंड मोठा परिणाम जगभरच्या डाव्या चळवळीवर झाला. तुम्ही साम्यवादी असा किंवा नसा या परिणामापासून वाचणे अशक्य होते. कारण आता भांडवलशाही अर्थव्यवस्थेला दुसरा पर्याय दिसत नव्हता. हे आंतरराष्ट्रीय पातळीवर घडत होते. तर देशपातळीवर खुल्या व्यापारावर आधारित अर्थव्यवस्थेकडे देशाचा प्रवास सुरु झाला होता. समता , शोषणमुक्त समाजनिर्मितीचे स्वप्न पहाणाऱ्या आदर्शवादाला हा एक मोठा तडा होता. ज्या स्वप्नांना जीवनभर जपले ती स्वप्ने अशी भंगणे क्लेशकारक होते. हरसूदच्या मेळाव्याची चित्रफीत पाहताना एक गोष्ट जाणवत होती की विकास साधण्यासाठीचे जे मार्ग त्या भाषणात सुचवले जात होते त्यांच्याबद्दल आज कोणी बोलत देखील नाही. उदाहरणार्थ, परदेशी भांडवलाला या मेळाव्यात पूर्ण विरोध केलेले होता. आज परदेशी गुंतवणूकीला विरोध करणे अनेकांना हास्यास्पद वाटेल. आजही परदेशी गुंतवणूकीला विरोध करणारी भूमिका काहींची असू शकेल पण त्या भूमिकेला त्यावेळेस असलेलेले समर्थन आज पूर्णतः विरले आहे. हे एक उदाहरण. अशी इतर अनेक उदाहरणे सांगता येतील. हरसूदच्या मेळाव्याचा काळ हा शासन आणि बाजारपेठ यांच्या नात्यातील पुनर्रचनेचा काळ होता. अनेक क्षेत्रात खाजगी क्षेत्राला वाव देण्यात आला. आणि त्याला मोठा विरोध झाला. पण आज जर कोणीही ज्या क्षेत्रात खाजगीकरण झाले त्या क्षेत्राचे पुन्हा राष्ट्रीयीकरण व्हावे असे अशी भूमिका घेत देखील नाही. कारण त्या भूमिकेला जनमताचे समर्थन लाभणार नाही याची त्यांना खात्री असते. 1990 च्या आसपास जे मन्वंतर देशाच्या अर्थव्यवस्थेत झाले त्याचे समर्थन करणे हा येथे उद्देश नाही. ती वेगळ्या पातळीवरील चर्चा ठरेल. पण आज जर चळवळी क्षीण झाल्या आहेत किवा चळवळीतील लोकांना आपण अप्रस्तुत झालो असे वाटत असेल, किंवा आपण जपलेला आदर्शवाद आज लोप पावत चालला आहे असे वाटत असेल तर त्याचे कारण 90च्या मन्वंतरात आहे. पण शोषणमुक्त समाजाचे, समन्यायी

विकासाचे स्वप्न बाळगणारा आदर्शवाद लोप पावण्याची गरज नाही. तो लोप पावला असे आपल्याला वाटते याचे कारण त्या आदर्शाकडे जाण्याचे आपले मार्ग अव्यवहार्य ठरत आहेत.

'ऐसी अक्षरेच्या' संपादकांनी जे टिपण पाठवले आहे त्यात म्हंटले आहे की "सामाजिक, राजकीय आणि वैचारिक चळवळींसाठी पुष्कळ सामग्री एका काळापर्यंत महाराष्ट्रानं दिली. स्वातंत्र्यपूर्व काळातल्या समाजसुधारकांपासून, विचारवंतांपासून आणि राजकीय नेत्यांपासून ते आज पन्नाशीत असलेल्या मराठी माणसांना परिचित असलेल्या नरहर कुरुंदकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, दुर्गा भागवत, पु.ल. देशपांडे, मे.पुं.रेगे, राम बापट, गो.पु. देशपांडे वगैरेंपर्यंत ही परंपरा चालू राहिली. तसंच, मराठी माणसानंही आपल्या आस्थेच्या चळवळींना जमेल तसा आधार दिला. कधी तो सक्रीय सामाजिक सहभागातून होता, तर कधी केवळ व्यक्तिगत, म्हणजे स्वत:च्या आयुष्याची दिशा बदलण्याइतपत होता. विचारवंत, चळवळींचे नेते आणि समाज ह्यांच्यामधला मोठा दुवा असणाऱ्या प्रसारमाध्यमांचाही ह्यात मोठा वाटा होता. गेल्या काही वर्षांत मात्र  परिस्थितीत मोठे आणि खेदजनक बदल झाले."

या वरील परिच्छेदात ज्या व्यक्तींची नावे घेतली आहेत त्यात अजून अनेक नावे टाकता येतील. वसंत पळशीकर , दि. के. बेडेकर , शरद पाटील यांचाही त्यात समावेश करता येईल. यातील दुर्गा भागवतांचे नाव हे पूर्णतः सांस्कृतिक क्षेत्रातील वाटते. पण ते नाव वगळता ईतर सर्व लोक हे डाव्या विचाराचे होते आणि आहेत. या डावेपणात अनेक छटा आहेत. पण एक समान धागा आहे. तो म्हणजे मार्केट किंवा 'बाजार' व्यवस्थेच्या सहाय्याने दारिद्र्य दूर करता येईल , विकास साधता येईल याबद्दलचा अविश्वास. या डावेपणात दोन गुणात्मक फरक देखील आहेत. एक विचारप्रवाह माणूस बदलणे यावर मोठा भर देतो आणि दुसरा विचारप्रवाह व्यवस्था परिवर्तनाला प्राधान्य देतो. पहिला प्रवाह गांधीवादाशी जवळ आहे तर दुसरा साम्यवादाच्या. दोन्ही विचारसरणीत खुली बाजारपेठ हे विकासाचे एक मोठे साधन आहे याबद्दल मोठा अविश्वास आहे. आणि प्रत्यक्षात भारतीय जनतेला मात्र खुल्या बाजाराच्या ठायी असलेल्या विकासाची शक्यता , आशा आणि खात्री भारतीय जनतेला वाटतेय. डाव्या चळवळीला आपण कालबाह्य झालोय असे वाटत असेल तर त्याचे कारण आज जनतेत असलेले खुल्या बाजारपेठेत असलेल्या या शक्यतांचे आकर्षण हे आहे. आणि हे आकर्षण अनाठायी निश्चितच नाही.

समजातील एका मोठ्या वर्गाला 1990 नंतरच्या खुल्या अर्थव्यवस्थेचा फायदा निश्चितच झाला आहे. याच खुल्या व्यापाराचे अंग असलेल्या माध्यम क्रांतीमुळे विशेषतः मोबाईलमुळे समजातील दुर्बल घटकांना आपले सबलीकरण झाले आहे असे वाटतेय आणि त्यात निश्चितच तथ्य आहे. पण याचा अर्थ असा नाही की शोषणमुक्त समाज निर्मितीचे स्वप्न, विषमता निर्मुलनाचे स्वप्न हा आपला आदर्शवाद, ज्याला ढोबळमानाने आपण डावा आदर्शवाद म्हणू, तो डावा आदर्शवाद आज कालबाह्य झाला आहे. हा आदर्शवाद काल जितका प्रस्तुत होता आजही तितकाच प्रस्तुत आहे. हा आदर्शवाद, हे स्वप्न आपल्या चळवळीचा गाभा असेलच. पण एक अडचण मात्र आहे.

अनेकांना बाजारपेठ आणि आणि हा आदर्शवाद या तत्वतःच एकमेकाविरुध्द असलेल्या गोष्टी वाटतात. त्याला एक खोल मानसिक कारण आहे. स्वहितदक्ष अश्या व्यक्तींच्या खुल्या विनिमयातून सर्वांचेच हित साधले जाते या तत्वावर बाजारपेठेवर आधारित विकासाचे तत्त्वज्ञान उभे आहे. येथे Adam Smith च्या 'Invisible Hand' ची आठवण व्हावी. प्रत्येकाने आपला स्वार्थ साधायचा प्रयत्न केला आणि त्यामुळे सर्वांचेच हित होते. पण या तत्वाने डाव्या आदर्शवादाला मोठा तडा जातो. कारण असे होणार असेल तर मग समाजातील वंचित आणि शोषित घटकासाठी त्याग करणे या मूल्याचे काय? स्वार्थापलीकडे जाणारा माणूस घडवण्याच्या स्वप्नाचे काय? सामाजिक न्याय या संकल्पनेचा आधार

काय? संपत्तीच्या न्याय्य वाटपाच्या मुद्द्याचे काय? या साऱ्याला काहीच अर्थ नाही का? बाजारपेठ (मार्केट) या शब्दाला डाव्या चळवळीकडून येणाऱ्या नकारात्मक मानसिक प्रतिक्रियेला हे खोलवरील कारण असते. ज्या मुल्यांवरील निष्ठेमुळे आपले जीवन अर्थपूर्ण होते त्या मूल्याला खुल्या बाजाराचे तत्वज्ञान मोठा तडा देते.

पण येथे अनेक प्रश्न निर्माण होतात. सर्वसाधारणपाने असा समज आहे की Invisible Hand ची थियरी मांडणाऱ्या Adam Smith ने स्वार्थ हीच माणसाची मूळ प्रेरणा आहे असे मानले होते. आणि म्हणून खुल्या व्यापाराचा पुरस्कार करणारी विचारसरणी ही माणसाच्या स्वार्थाच्या प्रेरणेला अधोरेखित करणारी असणे हे स्वाभाविकच आहे असे मानले जाते. परंतू Adam Smith ची मानवी स्वभावाची समज ईतकी संकुचित नव्हती. माणूस स्वहितदक्ष असतो एव्हढाच त्याचा अर्थ होता. माणसातील सामाजिकता, स्वार्थापलीकडे जाण्याची प्रवृत्ती याची खोल जाण आणि आदर स्मिथच्या मनात होता. आणि त्यामुळे मुक्त अर्थव्यवस्थेचे समर्थन करणारी आणि कोणत्याही प्रकारे संपत्तीच्या फेरवाटपाला तत्वतःच विरोध करणारी , कोणत्याही कल्याणकारी योजनेला विरोध करणारी (Ayn Rand चा वारसा सांगणारी) जी विचारसरणी आज आपला प्रभाव गाजवते आहे त्या विचारसरणीला Adam Smith चा वारसा सांगता नाही सांगता येणार. आणि Adam Smith डाव्या विचारसरणीच्या लोकांनाही आपला वाटू शकतो. तसा तो वाटला पाहिजे. कारण कोट्यावधी लोकांना दारिद्र्याच्या खाईतून बाहेर काढण्याची क्षमता असलेल्या बाजारपेठेच्या क्षमतेकडे त्याने आपले लक्ष वेधले. बाजार (मार्केट) हा समाजातील संपत्ती निर्मितीचे , दारिद्र्यनिर्मुलनाचे एक महत्वाचे साधन आहे असे मानल्याने आपण Ayn Rand प्रणीत उजव्या विचारसरणीला पुष्टी देवू अशी भीती बाळगण्याचे कारण नाही. कारण खुलता आर्थिक व्यवस्थेमधून जी संपत्ती निर्माण होते त्या संपत्तीचे समाजात वाटप कसे व्हावे हा प्रश्न राजकीय पटलावरील वैध प्रश्न ठरतो. कल्याणकारी शासकीय योजनासाठीचा आग्रह धरण्याचे आपले राजकीय स्वातंत्र्य या भूमिकेत अबाधित रहाते. इतकेच नव्हे तर कोणत्या क्षेत्रात बाजाराचे तत्व लावले गेल्याने मानवी जीवनाच्या गुणवत्तेला बाधा येईल हा प्रश्न देखील राजकीय चर्चेच्या परिघात रहातो. येथे फक्त एकच महत्वाचा निकष पाळावा लागेल. तो असा की विषमता निर्मुलनाच्या आग्रहामुळे संपत्तीनिर्मितीचा वेग कमी होवून त्याचा फटका समाजातील गरीब जनतेला बसत असेल तर विषमता निर्मुलनाऐवजी दारिद्र्यनिर्मुलानाला प्राधान्य द्यावे लागेल. यातच नैतिकता आहे.

भारतातील डावी चळवळ प्रामुख्याने मार्क्स, गांधी आणि जयप्रकाश–लोहिया अश्या तीन प्रवाहांची आहे. यामध्ये बाजारपेठेला सामावून घेणाऱ्या आणि तरीही समतेच्या मूल्याचा पुरस्कार करणाऱ्या John Rawls सारख्या प्रभावशाली विचारवंताचा प्रभावच नाही. (याचे कारण हा तत्वज्ञ अमेरिकन आहे हे तर नाही?)

बाजारपेठेकडे खुल्या दृष्टीने पहाणाऱ्या (पण फक्त एक उपयुक्त साधन म्हणून), डाव्या भूमिकेची व्याख्या कशी करता येईल?

'व्यक्तीला लाभणारे आर्थिक यश हे आजच्या व्यवस्थेत त्या व्यक्तीच्या प्रयत्नापलीकडील घटकांवर जास्त अवलंबून असते. म्हणून ही स्पर्धा न्याय्य नाही. ही स्पर्धा न थांबवता या स्पर्धेतून निर्माण होणाऱ्या संपत्तीचे वाटप ही स्पर्धा अधिक न्याय्य होण्यासाठी करण्याचा आग्रह धरणारी व्यक्ती ही डाव्या विचारसरणीची असे म्हंटले गेले पाहिजे.' डावेपणाची ही अतिशय व्यापक व्याख्या मानता येईल. थोडक्यात खुल्या अर्थव्यवस्थेतील आर्थिक स्पर्धा ही अन्याय्य व्यवस्थेतील स्पर्धा आहे हे ओळखून देखील तिला अवरोध न करता ही स्पर्धा अधिकाधिक न्याय्य होण्यासाठी, या स्पर्धेत भाग न घेवू शकणार्या किंवा स्पर्धेला खूप मागील स्थानावरून सुरवात करणाऱ्या स्पर्धकांसाठी स्पर्धेतील यशस्वी स्पर्धकांकडून कर रूपाने मिळणाऱ्या पैशाचा वापर करणे हे या डाव्या भूमिकेत गृहीत आहे. यात व्यक्तीच्या अंगभूत

किंवा कमावलेल्या गुणांच्या विकासाला विरोध नाही. पण ही स्पर्धा विषम पातळीवरील स्पर्धाकांमधील असल्यामुळे त्यात मिळालेल्या आर्थिक यशावर यशस्वी स्पर्धकांचा तत्वतः नैतिक हक्क नसेल.

या भूमिकेत आर्थिक उदारीकरण , जागतिकीकरण यांना नकार नाही. परंतु असे असताना देखील न्याय्य समाजनिर्मितीचे स्वप्न बघणाऱ्या आदर्शवादाला कुठेही बाधा नाही.

डाव्या चळवळीने हा खुला दृष्टीकोन स्वीकारल्यास आज आपण अप्रस्तुत झालो आहोत असे वाटल्यामुळे आलेल्या मरगळीतून, आणि वांझ स्मरण रंजनातून (nostalgia) आपण बाहेर येवू शकू. अफाट दारिद्र्य आणि विषमता असलेल्या , कमालीच्या अन्याय्य भारतीय समाजव्यवस्थेत अश्या डाव्या चळवळीची मोठी गरज आहे. आज जेंव्हा आक्रमक हिदुत्ववाद आणि संपत्तीच्या वाटपाला तत्वतःच नकार देणाऱ्या उजव्या विचारसरणीची सांगड घातली जातेय आणि त्याला मोठे यश मिळू पहात आहे तेंव्हा तर हे आव्हान जास्तच गंभीर बनतेय. डाव्या चळवळीने पुन्हा प्रस्तुत होण्याची आज नितांत गरज आहे.

(*ऐसी अक्षरे, दिवाळी अंक 2014* च्या सौजन्याने)

milind.murugkar@gmail.com

•••

# ईश्वर - एक मुक्त चिंतन

*भालचंद्र काळीकर*

तत्त्वज्ञान श्रद्धा–अंधश्रद्धा

"आस्तिक विरुद्ध नास्तिक" असा एक कायमचा घोळ समाजाच्या वैचारिक विश्वात चालू असतो. हा घोळ आस्तिकांनी घातला आहे. नास्तिकांची विचारसरणी सुस्पष्ट असते. निरीक्षण-परीक्षण-प्रत्यक्ष प्रयोग-गणितीय पडताळणी ह्या वैज्ञानिक प्रक्रियेतून निष्पन्न झालेले सत्य विवेकाच्या प्रकाशात स्पष्ट दिसत असल्यामुळे नास्तिकांच्या मनात कुठलाही संदेह नसतो. आस्तिकांजवळ मात्र काल्पनिक गृहीतकांशिवाय कोणतेच साधन नसते. निराधार परंपरांवर डोळे मिटून श्रद्धा ठेवीत ते अंधारात चाचपडत असतात. कुठलीही प्रायोगिक सिद्धता न लाभलेल्या गूढ, गहन, अनाकलनीय, धूसर अशा गोष्टींचे आस्तिकांना विलक्षण आकर्षण असते. सुबोधतेपेक्षा दुर्बोधतेकडे ओढा असणे, स्पष्टतेपेक्षा धूसरता अधिक आवडणे, प्रकाशापेक्षा अंधार बरा वाटणे, ज्ञानाऐवजी अज्ञानात सुख वाटणे , आकारापेक्षा निराकारात रमावेसे वाटणे हा वैचारिक जगतातील मोठा विरोधाभास आहे.

वास्तविक एखादी गोष्ट अस्तित्वात आहे(अस्ति) असे मानणारा त्या गोष्टीपुरता आस्तिक मानता येतो. तसेच ती गोष्ट अस्तित्वात नाही(न अस्ति) असे मानणारा त्या गोष्टीपुरता नास्तिक म्हणता येईल. तथापि सामान्यपणे ह्या संज्ञा ईश्वराच्या अस्तित्वासंदर्भात वापरतात. परंतु आस्तिक जगतात ईश्वर ह्या संकल्पनेविषयीं मोठा गोंधळ आहे. ईश्वरा(देवा)ची निश्चित अशी व्याख्या ते करू शकत नाहीत. असंख्य धर्मग्रंथ आध्यात्मिक तत्त्वज्ञाने, दर्शने, पुराणे इत्यादि सहित्य जगात उपलब्ध आहे. पण ईश्वर म्हणजे नेमके काय हे कुठेच सापडत नाही. कोणत्याही दोन मतांत एकवाक्यता आढळत नाही."तर्कोऽप्रतिष्ठ: श्रुतयोर्विभिन्ना नैको मुनिर्यस्य मतं प्रमाणम्।धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायाम्।" असेच शेवटी सामान्य जिज्ञासूला म्हणावे लागते.

ईश्वर किंवा देव ही संकल्पना आस्तिक जगतात अनेक पातळ्यांवरून मांडली जाते. त्यांतील दोन प्रमुख पातळ्या

(प्लेनस्) अशा:

एक म्हणजे सृष्टिनिर्मितीचे तत्त्व व त्याचा अभ्यास आणि दुसरी म्हणजे "आराध्य (उपासनेचे) तत्त्व)" वास्तविक ह्या दोन संपूर्णपणे भिन्न गोष्टी आहेत. त्यांचा परस्परांशी काही संबंध असायला नको. आणि तसा तो नाहीही. पण या दोहोंना "ईश्वर" हे समान नामाभिधान मिळाल्यामुळे एकच गोंधळ निर्माण झाला आहे. खरे तर या दोन्ही गोष्टींना (तत्त्वांना, संकल्पनांना) वेगवेगळी नावे असती तर सर्वच गोंधळ टाळता आला असता. पण आस्तिकांनी आपल्या सोयीसाठी तो घातला.

सृष्टिनिर्मितीचे तत्त्व व त्याचा अभ्यास ही संपूर्णपणे विज्ञानाच्या अखत्यारीतील गोष्ट आहे. हा अभ्यास त्या क्षेत्रात अविरत चालू आहे. विश्वनिर्मितीचे कोडे अजून सुटलेले नाही हे खरे आहे. पण वैज्ञानिकांनी त्याबाबतीत खूप प्रगती केली आहे. ती चालूच राहाणार आहे.(अध्यात्माने उगीचच ही जबाबदारी आपल्या शिरावर घेतली आहे.)

उपासनेचा देव ही मात्र वेगळी संकल्पना आहे. त्याला व्यक्तिसापेक्ष देव (पर्सनल गॉड) असे म्हणतात. हा देव भक्तांच्या प्रार्थनांना प्रतिसाद देतो. पूजा-अर्चा, व्रत-वैकल्ये, अभिषेक-अनुष्ठाने आदींनी संतुष्ट होतो. जप-तप, उपास-तापास, आदींनी प्रसन्न होतो. नवसाला पावतो. पापविमोचन करतो. थोडक्यात म्हणजे चमत्कार घडवितो. अशी आस्तिकांची कल्पना आहे. ह्या कल्पनेला ते "श्रद्धा" असे नाव देतात. परंतु जगात चमत्कार घडत नसतात. प्रत्येक घटनेमागे कुठलातरी निसर्गनियम असतोच. हे वैज्ञानिक क्षेत्रातील मार्गदर्शक तत्त्व मान्य असणाऱ्या नास्तिकांना असा "चमत्कारी" देव मान्य नसेल तर त्यात नवल नाही. सृष्टिनिर्मितीशी अशा देवाचा संबंध नाही. पण आध्यात्मिक लोक तो जोडतात. कारण ते त्यांच्या सोयीचे असते. चमत्कार करणाऱ्या देवावर नास्तिकांनी अविश्वास दर्शविला की,"मग जग कुणी निर्माण केले ते सांगा." ह्या आव्हानाची ढाल त्यांना पुढे करता येते.आणि ,"हे कोडे सोडवायचे प्रयत्न विज्ञानिक करीत आहेत." असे प्रामणिक उत्तर देण्याचा प्रयत्न करताच, पुढचे काही ऐकून न घेता,"म्हणजे अजून सुटले नाही ना? मग आम्ही म्हणतो ते मान्य करा. हे जग देवाने निर्माण केले आहे. तोच जगन्नियंता आहे. तो काहीही करू शकतो.त्याला संतुष्ट ठेवण्यासाठी सर्व कर्मकांडे करावी लागतात." असा आग्रह धरीत ईश्वराच्या अस्तित्वावर आपल्याच मनाने शिक्कामोर्तब करतात. आणि लगेच न्यूटन, आर्किमिडीज आदींच्या सिद्धांताना वाकुल्या दाखवीत साधुवाण्याच्या नौकेचे बुडणे वा तरंगणे, प्रसाद न खाणे वा खाणे यावर अवलंबून ठेवणाऱ्या कथेचे भक्तिभावाने श्रवण करतात. गुरुचरित्राची पारायणे करतात. शिर्डी-शेगावच्या वाऱ्या करतात. आस्तिकांच्या दैनंदिन व्यवहारातही देव ही संकल्पना पूर्णतया मिसळून गेली आहे. सर्व ऐच्छिक इच्छापूर्तीसाठी त्या काल्पनिक देवाची उपासना ते सतत करीत असतात. इच्छापूर्ती न होऊन सुद्धा.

आस्तिकांपैकी जवळपास पंचाण्णव टक्के लोक हे असे उपासनेचे भक्त असतात. उपासनेची कर्मकांडे केल्याने देव आपल्यावर प्रसन्न होऊन आपले मनोरथ पूर्ण करील अशी त्यांची श्रद्धा असते. आपण ईश्वराचे प्रतिनिधी आहोत असा दावा करणारी, बाबा-बापू, बुवा-महाराज, ताई- देवी - माताजी अशी भोंदू मंडळी ह्याच आंधळ्या व भाबड्या श्रद्धेचा लाभ उठवतात. आपल्या अशा श्रद्धा, तर्काच्या, विवेकाच्या कसोटीवर खऱ्या उतरणार नाहीत हे त्यांच्यापैकी कांही जणांना, विशेषत: सुशिक्षितांना जाणवत असते. पण त्या श्रद्धा सोडवतही नाहीत. मग त्यांना बळकटी आणण्यासाठी ते उरलेल्या पाच टक्क्यांचा आधार घेतात.

हे पाच टक्के आस्तिक बुद्धिमान, ज्ञानी, प्रतिभासंपन्न , विचारवंत असतात. मानवी जीवनाच्या सर्व पैलूंचा त्यांनी अभ्यास केलेला असतो. चिंतन असते. मानवहिताची तळमळ त्यांना लागलेली असते. ते धर्माची शिकवण देतात.पण

त्यांचा धर्म "धारणात् धर्म इत्याहु: धर्मो धारयते प्रजा:।" ह्या व्याख्येतला असतो.सांप्रदायिक कर्मकांडाशी त्याचा काही एक संबंध नसतो. हे ज्ञानी, प्रज्ञावंत, विचारवंत मानवधर्माच्या प्रसारासाठी स्वत:ला वाहून घेतात. त्यामुळे ते सर्वांनाच आदरणीय असतात. नास्तिकांनासुद्धा. कारण ते विवेकाची कास धरून आपले विचारविश्व उभारत असतात. ते देव मानतात हे खरे असले तरी त्यांची ईश्वरकल्पना व्यापक आणि विशाल असते. पण ते आस्तिक आहेत एवढ्याच काडीचा आधार घेऊन पंचाण्णव टक्के उपासना आस्तिक हे नास्तिकांवर दडपण आणतात. "म्हणजे तुम्ही शंकराचार्यांना मानता ना? ज्ञानेश्वर-तुकाराम यांच्याविषयी तुम्हाला आदर आहे ना? विवेकानंदांचे तुम्ही प्रशंसक आहात ना?" अशा प्रश्नांचा मारा सुरू करतात. नाही म्हणायची सोय नसते. "हो" म्हणताच, आस्तिकतेचा दुसरा अर्थ माहीत नसल्यामुळे " मग तुम्ही आस्तिकच आहात. ते देव मानतात. तुम्हीही माना. बसा पूजेला म्हणा केशवाय नम:।" अशी कर्मकांडी आस्तिकांची रीत असते."शंकराचार्यांनी कधी लघुरुद्र करण्याचा आदेश दिला नव्हता की ज्ञानेश्वरांनी शिवलीलामृत वाचायला सांगितले नव्हते; की विवेकानंदांनी शनिमाहात्म्य वाचाण्याचा सल्ला दिला नव्हता." असा युक्तिवाद त्यांच्यापुढे व्यर्थ ठरतो. उलट ,"नवसे करोनी पोरे होती ।तरी का करणे लागे पती?।"असा रोकडा सवाल करणाऱ्या संतांच्या अंगी "भक्तिविजयासारखे " ग्रंथ लिहून चमत्कार चिकटविले. ज्ञानियांच्या राजाची नेमणूक भिंत चालविण्याच्या कामी केली. संत आणि उपासनेचे आस्तिक ह्यांच्यात "देवाला मान्यता "(तीही केवळ शाब्दिक ) एवढेच साम्य आहे. संत त्यांच्या विश्वात्मक देवाजवळ "जो जे वांछील तो ते लाहो। प्राणिजात॥" असे पसायदान मागतात तर पोथिनिष्ठ आस्तिक पोथीच्या "फलश्रुती" तील आश्वासने खरी करण्यासाठी देवाला साकडे घालतात. ऐहिक स्वार्थ साधणे एवढाच त्यांचा हेतू असतो.

खरी गोष्ट अशी आहे की आपला समाज स्थितिशील आहेत. गती त्याला मानवत नाही. शारीरिक आळसासोबतच वैचारिक आळसही त्याच्यात भिनला आहे. सखोल विचार करणे, चिकित्सा करणे, शंका उपस्थित करणे, प्रश्न विचारणे अशा वैचारिक "क्रियांचा" त्याला मनस्वी कंटाळा आहे. त्यामुळे पूर्वसूरींकडून आयत्या मिळालेल्या विचारधनावर तो गुजराण करतो. शिवाय ह्या आळसाची सतत सोबत करीत असते ते भय. पोथीत सांगितल्याप्रमाणे आचरण न केल्यास, नवस न फेडल्यास, ग्रहशांती न केल्यास देवाचा वा ग्रहांचा कोप होईल ही भीती सतत पाठीशी असते. त्याच बरोबर विचारांना विवेकाची बैठक देण्यासाठी जे धाडस लागते त्याचा पूर्ण अभाव आस्तिकांमध्ये असतो. नाहीतर एरव्ही शंकराचार्यांचे गुणगान करणाऱ्या आस्तिकांनी त्याच आचार्यांच्या ,"नहि श्रुतिशतमपि शीतोग्निरप्रकाशो वेति ब्रुवन् प्रामाण्यमुपैति।" (अग्नी हा शीतल आणि प्रकाशरहित आहे असे शंभर वेदांनी सांगितले तरी त्याला विश्वासार्हता प्राप्त होत नाही.) ह्या विवेकपूर्ण विधानाकडे दुर्लक्ष केले नसते. ही एक वैचारिक दुर्बलताच आहे.

हे भय आणि दुर्बलता लपविण्यासाठी आस्तिक लोक, विशेषत: शिकलेले, त्यांच्याभोवती भारदस्त अशा मोठमोठ्या शब्दांचे जाल विणतात. रंगीबेरंगी शब्दतंतूंचे हे जाल दिसायला सुंदर दिसते व त्या आड भय आणि विचारदौर्बल्य ही वैगुण्ये झाकली जातात. मोहक शब्दांच्या कोंदणात बसविलेला मूल्यहीन असा श्रद्धेचा खडा आकर्षक भासतो. शब्दांच्या ह्या भूलभुलैयाच्या आधाराने नास्तिकांवरही ते आस्तिकतेचा शिक्का मारण्याची जादू करून दाखवितात. पूजन, वंदन, आदर, प्रार्थना ह्या जणू देवासाठीच राखून ठेवलेल्या क्रिया आहेत अशी समजूत करून घेऊन (आणि इतरांचीही करून देऊन ) मग जे जे वंदनीय, पूजनीय, आदरणीय, प्रार्थनीय ते ते सर्व ईश्वरस्वरूप आहे असा आभास ते निर्माण करतात. सुंदर, रमणीय, आनंददायी, अशा प्रत्येक गोष्टीत (मग ते एखादे दृश्य असो, स्वर असो, स्पर्श असो वा सुवासिक पुष्प असो) त्यांना देवच दिसतो. त्यातूनच मातृदेवोभव, पितृदेवोभव, अतिथिदेवो भव, "देश हा देव असे माझा", अशा

काव्यमय कल्पना प्रसृत होतात. वास्तविक आईला देव मानले पाहिजे का? तिला आईच राहू दिले तर तिच्याविषयींचा पूज्यभाव, कृतज्ञता कमी होतात का? देशाला नुसतेच "देश" किंवा फार तर "माझा देश" म्हटले तर काय बिघडते? भगतसिंग पूर्णपणे नास्तिक होते. त्याने त्यांची देशभक्ती उणावली होती का? पण पूजा, भक्ती ह्या संकल्पना "देवाशीच " निगडीत करून ठेवल्यामुळे, आई-वडील, देश आदींना "देव"त्व प्राप्त होते. प्रत्येक ठिकाणी देव आणलाच पाहिजे का? पूज्यभाव देवाशिवाय इतरही ठिकाणी ठेवता येतो.

काही प्रतिभावंत उच्चशिक्षित ह्याहीपेक्षा वरची शाब्दिक झेप घेतात. भव्य, दिव्य, विराट आदि विशेषणांनी नटलेले भरजरी पदर त्यांच्या श्रद्धेला असतात. त्यांचा परमेश्वर निर्गुण-निराकार असतो."म्हणजे नेमके काय? "असे विचारले असता, "वेद, उपनिषदे, प्रस्थानत्रयी, निरनिराळ्या स्मृती, ह्यांच्याकडे बोट दाखवितात. हे सर्व वाचण्याचा प्रयत्न केला असता सामान्य जिज्ञासूच्या हाती काही लागत नाही. ब्रह्म, परब्रह्म, परमात्मा अशा संकल्पनांचा नीट बोध होत नाही. अशा ईश्वराला मानण्याचे सामान्य व्यक्तीच्या जीवनात काय फरक पडतो, त्याचा उपयोग काय, अशा प्रश्नांची उत्तरे नाहीत. साधकांना मात्र आत्मसुख, ब्रह्मानंद, चिदानंद, मन:शांती, अशा गोष्टी प्राप्त होतात असे म्हणतात. सामान्य माणसाला अगम्य वाटणाऱ्या ह्या गोष्टी "साध्य" झाल्यानंतर साधक त्यांचे पुढे काय करतात हे कुणाला ठाऊक नसते. मुळांत असे साधक कितीसे असतात? त्यांच्यासाठी इतकी मोठी शब्दांची जंगले? तत्त्वज्ञानाचे डोंगर? त्यापेक्षा "बिकटवाट वहिवाट नसावी, धोपट मार्गा सोडू नको।" हे साधे तत्त्वज्ञान काय वाईट?

आस्तिकांच्या एका वर्गातील लोक सदैव ऐहिकाकडे पाठ फिरवून पारलौकिक सुखांच्या कल्पनेत मग्न असतात. ती सुखे उपभोगायला मिळावीत यास्तव इहलोकी पुण्यकृत्ये करीत असतात. ही पुण्यकृत्ये म्हणजे अर्थातच जप-तप, व्रत-वैकल्ये ,पंचाग्निसाधन इत्यादि. वस्तुत: सुखोपभोग हे इंद्रियांनी घ्यायचे असतात. आणि देह तर पृथ्वीवरच टाकून द्यायचा असतो. मग सुखे कुणाला मिळतात? आत्म्याला? पण त्याचे ध्येय तर मुक्ती आहे. मग सगळी धडपड कशासाठी? सगळाच वैचारिक गोंधळ.

काही कविमनाचे आस्तिक विराट अशा निसर्गातच देव शोधत असतात. आपली वैचारिक उंची दाखविण्यासाठी "आपण कर्मकांडे वगैरे मानीत नाही. त्या पातळीवर आपण नास्तिक आहोत." असे म्हणत, निगुणाचा सगुण आविष्कार म्हणजेच हा विराट निसर्ग. असे आम्ही मानतो व त्या पातळीवर आपण आस्तिकच आहोत." असे सांगतात. "प्रकाशाचा स्रोत असलेला, रोज पूर्वेला उगवणारा तेजोगोल हाच आमचा देव." असे प्रौढीने उद्‌गारतात. बस्स? एवढाच त्यांचा देव? विश्वाच्या ह्या अनंत पसाऱ्यात , महासागराच्या तुलनेत बिंदुएवढाही नसणारा हा ठिपका नमस्काराला पात्र ठरतो? ह्यांच्या निसर्गाचे विराटपण पृथ्वीपुरतेच मर्यादित असते. निसर्गाकडे त्यांना वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहाता येत नाही. तो दृष्टिकोन त्यांच्याजवळ नसतो. तळ्यात-मळ्यात असणारे हे लोक नुसता शब्दांचा फुलोरा फुलवितात. त्यांचा भाषाविष्कार हा केवळ शब्दच्छल असतो. "निर्गुण" का होईना पण देव त्यांना हवा असतो. उपासनेच्या माध्यमातून मनांत ठाण मांडून बसलेला देव, ते माध्यम सुटले तरी, आपली जागा सोडायला तयार नसतो. हे असे अर्ध नास्तिक खरे उपासनेचेच भक्त असतात. फक्त ताकाला जाऊन भांडे लपवितात. केवळ आभासमय (फँटम) असणारा देव जत्रेतल्या खेळण्याप्रमाणे लोकांपुढे मांडला जातो. यातील बहुतांश रूपे नवसाला पावणाऱ्या, चमत्कार घडविणाऱ्या उपासनेच्या देवाचीच असतात.(पुजारी, पुरोहित, फलज्योतिषी, वास्तुशास्त्री, तीर्थक्षेत्रातील पंडे , प्राणिक हीलिंगवाले,वगैरेंची भरभराटलेली दुकाने ह्याची साक्ष देतात.) फक्त त्यांना भव्य, दिव्य, विराट, वंदनीय, पूजनीय अशा विशेषणांनी सजविले जाते. देवाच्या अस्तित्वाची सत्यता पटविण्यासाठी महापुरुषांची, संतांची वचने तोंडी लावली

जातात.

आपल्या श्रद्धा आंधळ्या नसून डोळस आहेत असा डांगोरा पिटताना सुशिक्षित आस्तिक एका युक्तीचा अवलंब करतात. वैज्ञानिक सत्ये तर नाकारता येत नाहीत. तेव्हा "इफ यू कनॉट फाईट देम,जॉइन देम. "ह्या न्यायाला अनुसरून आपल्या श्रद्धांना विज्ञानाचा पाठिंबा आहे असे दडपून सांगतात. ज्ञात-अज्ञात-अल्पज्ञात अशा वैज्ञानिकांची, सोयीपुरती वाचलेली, त्यांच्या ग्रंथातील वाक्ये संदर्भ वगळून (out of contest) उद्धृत करतात. आणि विज्ञान व अध्यात्म समन्वय व्हावा अशी मागणीही करतात. अशा समन्वयाची गरज अध्यात्माला असेल, विज्ञानाला नाही. याविषयीं एक कळीचा मुद्दा मांडला येईल. तो म्हणजे आस्तिकांनी "देव" या संकल्पनेची एक निश्चित व कायमची अशी बहुमान्य व्याख्या करून टाकावी व तिलाच ठाम चिकटून राहावे. पुन्हा फाटे फोडू नयेत. तसे झाले तर गोंधळ कायमचा मिटेल. देवाला चिकटलेली लेबले, विशेषणे गळून पडतील. प्रामाणिक जिज्ञासूंची दिशाभूल थांबून त्यांना योग्य मार्ग दिसेल.आणि .....विधान धाष्टर्याचे वाटेल, पण शंकराचार्यांपासून ज्ञानदेव -तुकाराम-विवेकानंदांपर्यंतचे विवेकशील विचारवंत नास्तिकांच्या गोटात येऊ शकतील. कारण मग "देवा"ची व्याख्या नवसाच्या देवापुरतीच मर्यादित असेल.

bhalchandra.kalikar@gmail.com

●●●

# कुणाच्या खांद्यावर कोणाचे ओझे

*अश्विनी कुलकर्णी*

पुस्तक परीक्षण विकास विस्थापित

पी साईनाथ यांच्या वार्तांकनातून ग्रामीण, दुर्लक्षीत, पिडीत समाजाची परिस्थिती मुख्य इंग्रजी दैनिकातून दिसू लागली .हाच वारसा सांगणारे, इंग्रजीतून वार्तांकन करणारे जयदीप हर्डीकर यांनी A Village Awaits Doomsday (Penguin Books) हे पुस्तक लिहिले आहे.

सरकारने हाती घेतलेल्या विवीध विकास प्रकल्पाने ग्रस्त लोकांसंबंधी हे पुस्तक आहे .धरणे, विद्युत प्रकल्प, मोठे रस्ते, खाणी या व अश्या प्रकल्पांसाठी ज्यांना आपले पिढ्यान पिढ्याचे वास्तव्य सोडून बेघर व्हावे लागले त्यांच्या हृदयस्पर्शी कहाण्या यात आहेत .भारतातील विवीध भागातील, वेगवेगळ्या विकास प्रकल्पांनी बाधीत कुटुंबांना प्रत्यक्ष तेथे जाउन भेटून या कहाण्या लिहील्या आहेत .आणि या अश्या २१ कहाण्या वाचत असताना जे प्रश्न मनात येतात त्यांची चर्चा पुस्तकाच्या दुस−या भागात केलेली आहे .भाग अ या प्रत्यक्षदर्शी कहाण्या आणि भाग ब मध्ये या अनुषंगाने येणा−या काही मुद्यांची मांडणी अशी या पुस्तकाची रचना आहे.

पुस्तकाची व्याप्ती मोठी आहे .हे पुस्तक कोयना सारख्या जुन्या प्रकल्पापासुन अगदी जैतापुर आणी यमुना एक्सप्रेस हायवे सारख्या सध्या चर्चेत असलेल्या प्रकल्पांचा ; तसेच धरणे, आरक्षित जंगल, खाणी, विद्युत प्रकल्प अश्या भारतातील विवीध प्रदेशातील प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नाचा मागोवा घेते.

प्रकल्पग्रस्त कुटुंबांची आधीची उपजीविकेची साधने व राहणीमान आणि नंतरची संकुचीत झालेली उपजीविकेची साधने व खालावलेले राहणीमान याचे वर्णन व विश्लेषण, त्यांच्याच शब्दात त्यांचे म्हणणे काय आहे हे दिल्याने आपणही त्यांना भेटतो. ही या पुस्तकाच्या लिखाणाची जमेची बाजू आहे.

या सर्व कहाण्यांना भाग ब मधील मांडणीने व्यापक संदर्भ मिळतो .प्रत्येक प्रकल्पाला एक संघर्षाची बाजू आहेच आणि ते तसे का व्हावे याचे विश्लेषण केलेले आहे .सर्वात महत्वाचे म्हणजे प्रकल्पग्रस्त कोण हे ठरवणे , पुनर्वसनाचे नियोजन व अंमलबजावणी होणे, या संबंधीचे विवीध कायदे, नियम याची चर्चा केल्याशिवाय हे पुस्तक पूर्ण होउच शकले नसते .ही चर्चा शेवटच्या प्रकरणात येते .या सोबत विविध कायद्यांची यादीही दिलेली आहे.

या कहाण्यातुन भेटलेली माणसे आणि त्यांच्यासाठी सरकारची जबाबदारी, प्रशासनाचा कारभार हे सर्व एकत्रित आणि व्यवस्थित या अभ्यासपूर्ण पुस्तकात वाचायला मिळते.

परंतु सारखा प्रश्न हा पडतो की या कहाण्यांमधुन भेटलेल्या माणसांची परिस्थिती हे संपूर्ण परिस्थितीचे वर्णन आहे का? याचा अर्थ भारतभरातील कोणत्याही प्रकल्पात, कुठेही, केव्हाही, कोणाचेच पुनर्वसन ठीक झालेले नाही असे म्हणायचे का? पुनर्वसन वाईट झाल्याची जशी अनेक उदाहरणे आहेत तशीच ते बरे झालेली, ठीक झालेली, चांगली झालेली अजिबातच नाहीत का असा प्रश्न पडतो .अशी चांगली उदाहरणे मुद्दाम शोधून समजून घेणे या अश्या अभ्यासासाठी आवश्यक आहे .आवश्यक एवढ्यासाठी की पुनर्वसन प्रक्रिया कोण कोणत्या कारणांमुळे समाधानकारक होवू शकते हे समजले असते आणि नविन येऊ घातलेल्या कायद्याच्या संदर्भात चर्चा करताना ही माहिती व समज उपयुक्त ठरली असती. म्हणून या सर्व कहाण्या परत परत तेच तेच सांगत आहेत, फक्त मांणसांची नावे, प्रदेश, काळ आणि विकास प्रकल्पांचे तपशील बदलतात असे होते.

प्रत्येक विकास प्रकल्पातील पुनर्वसनाला आव्हान करणारे, प्रकल्पग्रस्तांची बाजू घेउन न्याय मागणारे संघर्ष उभे राहिले आणि या संघर्षातून बरेच काही चांगले बदलही झाले .मुळात संघर्ष करावा लागतो याचा अर्थ पारदर्शकता नसणे आणि जबाबदारीची स्पष्टता नसणे हे उघडच आहे .या मुळे जेथे लोकशाही पध्दतीने संवाद होऊ शकला असता तेथे आपल्याच सरकार विरोधात संघर्ष आणि आपलेच सरकार आपल्याच लोकांसमोर पोलीस नेऊन गोळीबार होईपर्यंतचे प्रसंग घडणे हे लोकशाहीसाठी लज्जस्पद नव्हे, घृणास्पद आहे .प्रत्येक ठिकाणच्या संघर्षाच्या प्रयत्नातून तिथल्या परिस्थितीत, पुनर्वसन प्रक्रियेतील पध्दतीवर काही परिणाम झाला असणार तो नेमका काय याची चर्चा त्या त्या कहाणी सोबत समजली असती तर त्या कहाणीला एक व्यापक संदर्भ मिळाला असता असे वाटते .परंतु या सर्व संघर्षाचा नविन येऊ घातलेल्या राष्ट्रीय पुनर्वसन कायद्याच्या मसुद्यावर प्रभाव आहे हे फक्त शेवटच्या प्रकरणात येते.

या पुस्तकाच्या लेखन शैलीबद्दल पडणारा आक्षेपवजा प्रश्न म्हणजे ती लेखकाची भूमिका अप्रत्यक्षपणे सुचित करते .म्हणजे पुस्तकाचा बाज माहिती देण्याचा, विश्लेशणाचा जरी असला तरी त्यातून लेखकाची मते अप्रत्यक्षपणे पोहचवली जातात .पण त्या मतांचे समर्थन करण्याची जबाबदारी टळते .त्यामुळे लेखकाने 'non committal' राहून आपले मत वाचकापर्यंत पोहचवले आहे.

प्रकल्प ग्रस्तांची प्रभावीपणे बाजू मांडणारे हे पुस्तक दिल्याबद्दल लेखक जयदीप हर्डीकरांचे अभिनंदन.

pragati.abhiyan@gmail.com

●●●

# सृष्टिक्रम आणि विवेक

*दिवाकर मोहनी*

जात-धर्म समाज इतिहास

जातिसंस्थेच्या उपपत्तीविषयी मी जी मांडणी केली आहे, ती अपुरी आहे असे माझ्या वाचकांशिवाय मलाही वाटत होते. माझ्या मित्रांचा माझ्या लिखाणावर आणखी एक आक्षेप आहे; तो आक्षेप असा की मी ब्राह्मणांना झुकते माप दिले आहे. त्यांनी जो अन्य जातींवर पिढ्यान् पिढ्या अन्याय केला आहे त्याची जबाबदारी त्यांच्यावर न टाकता मी सृष्टिक्रमावर किंवा कालचक्रावर टाकीत आहे. त्यामुळे आता ब्राह्मणांना कुठलेही प्रायश्चित्त घेण्याची गरज उरली नाही व हे माझे करणे योग्य नाही.

भारतात उच्चवर्णीयांनी अन्य जातींवर अन्याय केला, हे खरेच आहे. ते मी मुळीच नाकारत नाही. ब्राह्मणांनी जसा दुसऱ्या जातींना आपल्यापेक्षा कमी दर्जाच्या लेखून त्यांचे शोषण केले तसेच त्यांनी आपल्या स्वतःच्या जातीतील स्त्रियांवरही (ज्या ब्राह्मण होत्या) अनन्वित अत्याचार केले आहेत. त्यांच्या बायकांना त्यांनी एका परीने गुलामगिरीतच ठेवले. घरातल्या कुठल्याही संकटासाठी त्यांनी बायकांना जबाबदार धरले आहे. 'ही पांढऱ्या पायाची, आपल्या नवऱ्याला खाऊ न बसली' 'ही अपशकुनी, हिचे दर्शन नको', ही वांझोटी, - हिला मुलीच होतात आणि ह्यांसारखे अनेक आरोप तिच्यावर केले व तिला जगणे नकोसे केले आहे. विधवांना सती जायला भाग पाडले आहे. एखाद्या विधवेचे तिच्या तारुण्यसुलभ भावनांमुळे 'वाकडे पाऊल' पडले तर तिला जीव नकोसा केला आहे. अजून ह्या 21व्या शतकात त्यांना त्यांचा नवरा निवडण्याचे स्वातंत्र्य नाही. तो दुसऱ्या जातीचा असला तरी त्यांचे प्राण संकटात असतात. अन्यायपरंपरा अखंड चालू आहे.

भारतात ब्राह्मणांनी जसे अन्याय केले तसेच गोऱ्यांनी काळ्यांवर केले आहेत. गुलामगिरीची प्रथा किती शतकांपूर्वी सुरू झाली ह्याचा अंदाज नाही. प्राचीन काळी काही देशांमध्ये राजपुरुषांच्या मृत्यूनंतर त्याच्या बायकांना व दासदासींना त्याच्याबरोबर मारून पुरून टाकीत असत. वेठबिगारीची पद्धत अजून पुष्कळ ठिकाणी चालूच आहे. आपला धर्म श्रेष्ठ समजून तो तलवारीच्या बळावर इतरांवर लादला आहे. त्यासाठी घनघोर युद्धे, ती सुद्धा शतकानुशतके केली आहेत. आमचीच जमात श्रेष्ठ आहे, तीच राज्य करण्यास योग्य आहे, असे म्हणून इतर जातींनी आपली पायरी ओळखून वागावे अशा अपेक्षा केवळ भारतातच नव्हे तर इतर खंडांतही ठेवल्याचे आढळते. दक्षिण आफ्रिकेचा गेल्या 300 वर्षांचा इतिहास मी म्हणतो त्याची साक्ष देणारा आहे.

आदिवासींची लूट करणारे, त्यांचे भयानक शोषण करणारे, केवळ ब्राह्मणच नव्हते. सावकारांनी आपल्या ऋणकोंकडून वसुली करण्यासाठी कोणते अन्याय केले त्यांची गणती नाही. इंग्रजांचे राज्य येथे येण्यापूर्वी जितके राजे होऊ न गेले त्यांत काही अपवाद सोडले तर बाकीच्यांनी प्रजेचे भयंकर शोषण केले. नागपूरकर भोसल्यांनी बंगालपर्यंत स्वाऱ्या केल्या त्यात त्यांनी केवळ लूटमार केली असा लोकप्रवाद आहे. अजून तिथे लहानमुलांना बागुलबुवाची जशी भीती दाखवतात तशी 'मराठा बारगीरांची' दाखवली जाते.

एका जातीने दुसऱ्या जातीच्या लोकांना, एका धर्माच्या लोकांनी दुसऱ्या धर्माच्या लोकांना कमी लेखणे हा प्रकार जसा परशुरामाने 21 वेळा निःक्षत्रिय पृथ्वी केली त्यात आढळतो तसाच तो हिटलरने केलेल्या ज्यूंच्या शिरकाणातही दिसून येतो.

हे जे सगळे इतिहासात घडले ते त्या त्या व्यक्तींनी किंवा समाजगटांनी जाणीवपूर्वक किंवा हेतुपूर्वक केले असे मला वाटत नाही. अशा घटनांमध्ये कालचक्राचा सृष्टिक्रमाचासुद्धा काही प्रभाव होता असे मला वाटते. आज आम्हाला भेडसावणाऱ्या सर्वात महत्त्वाच्या बाबी ह्या श्रद्धेमुळे निर्माण झाल्या आहेत. मुस्लिमधर्मीयांनी इतरांना कालबाह्य वाटणाऱ्या 'शरीयातील' नियमांचा आग्रह धरणे, शीखांनी कृपाण धारण करण्याचा आग्रह धरणे, व तसे करण्याने ते ज्या प्रदेशांत राहतात तेथील प्रचलित कायद्यांचा भंग करणे ह्यांसारख्या न सुटणाऱ्या समस्या निर्माण होतात. येथे काही उदाहरणे देतो. एका चौदा वर्षाच्या मुस्लिम मुलीने इंग्लंडमध्ये लग्नाला नकार दिला तेव्हा बर्मिंगहॅम येथील सेंट्रल जामिया मशिदीचा इमाम मो. शाहीद अख्तर ह्याने ती 'शरीया'प्रमाणे विवाहयोग्य आहे असे सांगून तिला लग्न करावेच लागेल असा निर्णय दिला. तेथील कायद्याप्रमाणे लग्नाचे वय मुलींसाठी 16 वर्षे असे आहे. आता इमामाच्या फतव्याला बेकायदा म्हणून फेटाळून लावता येईल काय हा प्रश्न न्यायप्रविष्ट आहे. आपल्या देशात देखील जात पंचायतीचे 'खाप' पंचायतीचे निर्णय हे बहुधा स्त्रियांनाच अत्यंत जाचक असे असतात. स्त्रियांना, तसेच शूद्र मानल्या गेलेल्या जातींना, कोणत्या अन्यायाला तोंड द्यावे लागते त्यांच्या कथा न संपणाऱ्या आहेत. पण मला येथे पुन्हा सांगायचे आहे की हा अन्याय बुद्धिपुरस्सर जाणून–बुजून केला जातो की मनुप्रभावामुळे होतो ह्याबद्दल मी साशंक आहे.

माझ्या आतापर्यन्तच्या प्रतिपादनावरून असे वाटण्याचा संभव आहे की माणसे त्या सृष्टिक्रमाच्या हातातील बाहुले आहेत. पण ते तसे नाही. माणूस हा बुद्धिमान प्राणी आहे. त्याला सारासारविवेक करता येतो. योग्य काय अयोग्य काय हे त्याला समजते किंवा त्याने प्रयत्न केल्यास त्याला समजू शकते असे म्हणणे जास्त उचित होईल. तक्रार अशी आहे की तो त्याची विवेकबुद्धी वापरत नाही. त्याचा 'महाजनो येन गतः स पन्थाः' ह्या वचनावर दृढ विश्वास आहे. त्याच्या पूर्वजांनी जी वाट चोखाळली त्या वाटेवरून जाताना त्याला कसे सुरक्षित वाटते आणि त्या सुरक्षिततेच्या मोहापायी की काय, तो त्याच्या हातून होणारे अन्याय चालू ठेवतो. किंवा असे म्हणू या की त्याला आपल्या हातून काही अन्याय घडत आहे ह्याची जाणीवच होत नाही. आणि सर्वच समाज तसा अन्यास करीत असल्यामुळे, ज्या एक दोघांच्या मनात ह्या अन्यायाची जाणीव असते त्यांना त्याची टोचणी पुरेशी लागत नाही. सासवा सुनांना सासुरवास करतात. त्या सगळ्या दुष्ट किंवा क्रूर नसतात. सगळे सावकार, गुलामांचे मालक हे संवेदनशून्य नसतात पण जे समाजमान्य आहे त्याच्या विरोधात जाण्याचे धैर्य त्यांच्यात नसते. आणि एक दोघे गेले तरी त्याचा फारसा फरक समाजावर पडत नाही. न्या.मू. महादेव गोविंद रानडे ह्यांना त्यांच्या प्रथम पत्नीच्या मृत्यूनंतर एखाद्या विधवेशी विवाह करावा अशी तीव्र इच्छा होती. पण ते तसे करू शकले नाहीत. ह्या घटनेमागे त्यांच्या वडिलांचा आग्रह कारणीभूत असला तरी एकूण समाजाची वृत्ती 'यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं न करणीयं नाचरणीयम् ' अशी असते. सृष्टिक्रमामुळे ज्या समजुती मनामध्ये निर्माण झालेल्या असतात, त्यांना नष्ट करणे, त्यांचे निर्मूलन करणे अशक्यप्राय असते. ह्या अश्या समजुतींमध्ये देवावरचा विश्वास, आपलाच धर्म श्रेष्ठ ह्याचा विश्वास जसा असतो तसाच तो खाजगी मालकीविषयीही असतो. 'हे माझे, हे तुझे' ही भावना फार जुनी नसावी. मानवजातीचा इतिहास पाहता. काही जनावरांना माणसाळवता येते ही भावनासुद्धा सार्वत्रिक नाही. आजच्या आदिवासी समाजात गाय, बैल, घोडे, गाढवे ह्यांचा आपले श्रम कमी करण्यासाठी वापर झालेला आढळत नाही ह्याचे कारण ती मंडळी अजून निराळ्या मनूमध्ये आहेत, असे असले पाहिजे.

ज्या विश्वासाच्या मागे तर्कशुद्ध विचार नाही त्याला श्रद्धा म्हणतात. आणि ह्या श्रद्धा अत्यंत बळकट असतात. ज्यांना थोडे पलीकडचे दिसते, त्यांनी कितीही प्रयत्न केला तरीही श्रद्धांना झळ पोहोचत नाही. आणि त्या श्रद्धांमुळेच की काय, एकमेकांविषयी संशय निर्माण होतो. हिंदूना मुसलमानांविषयीं, मुसलमानांना हिंदूविषयी विश्वास वाटत नाही.

कितीही खटपट केली तरी तो विश्वास निर्माण होत नाही. हा अविश्वास फक्त भिन्न धर्मीयांमध्येच असतो असे नाही. तो वेगवेगळ्या जातींमध्ये असतो. सासूसुनांमध्ये असतो, नणदाभावजयांमध्ये असतो, नवराबायकोमध्ये किंवा बाप आणि मुलांमध्ये असतो, एका धंद्यातील भागीदारंमध्येही असतो. पुष्कळदा तो संशय निष्कारण असतो पण तो श्रद्धासदृश असल्याने त्याचे निराकरण करणे अशक्य असते.

श्रद्धा म्हणजे न ढळणारा विश्वास. अश्रद्धा म्हणजे श्रद्धेचा अभाव. ह्या अभावामुळे मन पुष्कळ मोकळे असते. कुठल्याही विधानाची दुसरी बाजू समजून घेण्याची येथे तयारी असते; जी श्रद्धेमध्ये नसते. 'तुम्ही काहीही म्हटले तरी मला तुमचं म्हणणं पटत नाही, पटू शकणार नाही. देव आहे म्हणजे आहे'. अश्या श्रद्धेमध्ये वृत्ती असते तेथे मनाचे दरवाजे बंद असतात. ह्यापेक्षा आणखी निराळा एक वर्ग असतो किंवा घडू शकतो. तो निःश्रद्धांचा. हे श्रद्धेच्या अंधारातून बाहेर पडलेले असता. पहिल्याने सश्रद्ध पण मागाहून ते अश्रद्ध बनलेले असतात. त्यांच्या मनातील श्रद्धांचा निरास झालेला असतो. ही अत्यंत अवघड वाटचाल आहे ती त्यांच्या मनाने केलेली असते. ह्यालाच विवेक करणे असे म्हणतात. असे होणे कष्टसाध्य आहे असाध्य नाही.

माझ्या पहिल्या लेखावर जी टीका झाली तिच्यात मी जो मनुप्रभावाचा मुद्दा मांडला आहे त्याचे खंडन कुणी केलेले नाही. मी केलेल्या मांडणीमुळे उच्चवर्णीयांना झुकते माप दिले गेले व त्यांच्या अपराधांवर दुर्लक्ष केले गेले असे म्हटले आहे. मला एवढेच सांगायचे आहे की असे अपराध जगभरात सर्वत्र घडले आहेत आणि घडत आहेत. जे घडून चुकले आहेत त्याबद्दल आता ते कितीही दण्ड असले तरी कोणालाही शिक्षा करता येत नाही. कारण ते घडवणारे आता हयात नाहीत. आज जे हयात आहेत त्यांनी अपराध केल्यास, त्यांना अवश्य दण्ड करावा. पण तो सौम्य असावा – कारण अपराधामागे मनुप्रभाव असू शकतो.

मला वाटते त्यासाठी आजचे कायदे पर्याप्त आहेत. पण सतत इतिहास मनात बाळगून पूर्वजांच्या पापांचे प्रायश्चित्त कोणाला भोगावे लागू नये. कारण पूर्वजांची पापे आपण शोधायला गेलो तर त्यातून कोणत्याच वर्णाचे लोक सुटणार नाहीत. आपल्यापेक्षा दुबळे आहेत त्यांना बरोबरीने न वागवण्याचा व त्यांचे शोषण करण्याचा अपराध सगळ्याच काळात व सगळ्यांकडूनच घडत आलेला आहे. त्याचा एकाधिकार कोणत्याही एका वर्णाकडे किंवा जातीकडे नाही. आज मानवजातीत जगामध्ये जितक्या काही समस्या आहेत, (ज्यामुळे दुःख – misery निर्माण झाले आहे) त्या सगळ्या मानवनिर्मित आहेत. त्या मानवांच्या गटातील अहंकारामुळे किंवा अज्ञानामुळे म्हणजे ह्या समस्येचे सम्यक आकलन न झाल्यामुळे निर्माण झाल्या आहेत. किंवा असे म्हणता येईल की त्या मनुप्रभावामुळे किंवा सृष्टिक्रमामुळे निर्माण झाल्या आहेत; विवेकाभावामुळे निर्माण झाल्या आहेत. माणसाच्या प्रवाहाबरोबर वाहत जाण्याच्या स्वभावामुळे त्या समस्या सोडविण्यासाठी आम्हा साऱ्यांना विवेकाची साथ धरावी लागणार आहे म्हणजेच इतिहासाकडे आणि वर्तमानाकडे पाहण्याचा आमचा दृष्टिकोण बदलावा लागणार आहे. आमच्या विचारविश्वाच्या मर्यादा ओलांडाव्या लागणार आहेत हे वेगळ्या तऱ्हेने पाहणे म्हणजेच मनाला decondition करणे हे अवघड आहे पण ते केलेच पाहिजे कारण हाच खरा पुरूषार्थ आहे असे मला वाटते.

dpmohoni@gmail.com

●●●